नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत मराठी अभ्यास परिषद, पुणे ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या भाषा आणि जीवन ह्या नियतकालिकाच्या (त्रैमासिक) अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून मराठी अभ्यास परिषदेद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व मराठी अभ्यास परिषद, पुणे यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व मराठी अभ्यास परिषद, पुणे यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मराठी अभ्यास परिषद

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास


राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मराठी अभ्यास परिषद

मराठी अभ्यास परिषद पत्रिका

भाषा आणि जीवन

वर्ष ८ : अंक २ : उन्हाळा १९९०



अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

मराठी अभ्यास परिषद

अनुक्रम

प्रकाशन : त्रैमासिक (जानेवारी, एप्रिल, जुलै, ऑक्टोबर)

संपादन-समिती : कल्याण काळे (प्रमुख), अशोक रा. केळकर, अंजली सोमण, द. दि. पुंडे, प्र. ना. परांजपे, मॅक्सीन बर्न्सन, विजया देव, आशा मुंडले

संपादकीय संपर्क व परीक्षणार्थ पुस्तके : कल्याण काळे, मराठी विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे ४११ ००७ (दूरध्वनी ३३६०६१/२४)

व्यवस्थापकीय संपर्क व पैशांचा भरणा : विजया देव, सुप्रिया ६१/१६, एरंडवणे, आयकर भवनासमोरची गल्ली, पुणे ४११ ००४ (दूरध्वनी ३३८८१५)

पत्रिकेची वर्गणी, परिषदेची वर्गणी, जाहिरातीचे दर : आवरणपृष्ठ तीन पहा.

सूचना : पत्रिकेत प्रसिद्ध होणाऱ्या लेखकांच्या मतांशी संपादक किंवा परिषद सहमत असतीलच असे नाही.

या अंकाच्या मुद्रणासाठी महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे अंशतः अनुदान मिळालेले आहे.

संपादक : कल्याण काळे / **प्रकाशक व मुद्रक :** मराठी अभ्यास परिषदेसाठी विजया देव
मुद्रणस्थळ : संजीव मुद्रणालय, ४६९ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मराठी अभ्यास परिषद

संग्राहक ज्ञान, सर्जक ज्ञान

आजचा सर्वसामान्य माणूस हा विचित्र परिस्थितीत सापडला आहे. सर्व प्रकारच्या प्रसारमाध्यमांनी त्याला घेरलेलं आहे. ही प्रसारमाध्यमं त्याला लक्ष्य करून त्याच्यावर सर्व प्रकारच्या माहितीचा सातत्यानं मारा करत आहेत. वर्तमानपत्रं, मासिकं, पुस्तकं, जाहिराती, आकाशवाणी, दूरदर्शन, चित्रपट, दृक्श्राव्य चित्रफिती, ध्वनिफिती इ. अनेक माध्यमांच्या द्वारे ज्ञानाचे लोंढेच्या लोंढे त्याच्यावर येऊन आदळत आहेत. त्यात खंड नाही. सकाळी उठल्यापासून ते रात्री धरणीला पाठ टेकेपर्यंत ही माध्यमं त्याचा पिच्छा सोडत नाहीत.

याचा परिणाम असा झाला आहे, की आजचा माणूस पूर्वीच्या माणसापेक्षा खूपच बहुश्रुत झाल्यासारखा वाटतो. रशियातील पेरेस्त्रोइका, संगणक विद्या, पर्यावरण, काश्मीर प्रश्न, सलमान रश्दीचा अपराध, स्टेफी ग्राफचा पराक्रम, हिंदुजा कुटुंबियांचे उद्योग, ग्रेटा गार्बो, कोकण रेल्वे, दलित साहित्य, महाभारत मालिकेतील खोटा भाग, कुमार गंधर्वांचं गाणं, इ. अनेक विषयांची तोंडओळख त्याला असते.

या गोष्टींचं कौतुक करत असतानाच त्याच्या या बहुश्रुततेबद्दल शंका येऊ लागतात. या माहितीला ज्ञान म्हणता येईल का ? ही माहिती त्यानं खरोखरच आत्मसात केलेली आहे, की 'सहज कानांवर पडली' या स्वरूपाची आहे ? यांपैकी किती विषयांवर त्याला अधिकारवाणीनं बोलता येईल ? यांतलं किती ज्ञान त्यानं पचवलेलं आहे ? या ज्ञानाचा त्याला खरोखरच किती उपयोग आहे ? या माहितीबद्दल त्याला स्वतःला किती आस्था आहे ? 'संग्राहक सर्वांचा, परि प्रभु न कशाचाही' अशीच त्याची अवस्था नाही काय ? मग या बहुश्रुततेला अर्थ तरी काय ?

वास्तविक पाहता ही खरी ज्ञानार्जनाची प्रक्रियाच नव्हे. जिच्याबद्दल आपल्याला आस्था नाही, जिचा आपल्याला काही उपयोग नाही, जिचा आपल्या पूर्वज्ञानाशी संबंध जोडता येत नाही, अशी माहिती म्हणजे ज्ञान नव्हे. जे ज्ञान आपण आस्थेनं मिळवतो, त्याचा पूर्वज्ञानाशी संबंध जोडतो, त्यावर आपण मनन, चिंतन करतो, ज्या ज्ञानाच्या प्रकाशात आपण नवीन गोष्टींचा अन्वयार्थ लावतो, ज्या ज्ञानावर आपण आपल्या पूर्वज्ञानाच्या संस्कारांचा, स्वतःच्या व्यक्तित्वाचा ठसा उमटवतो, ज्या ज्ञानाच्या साहाय्यानं आपण नवीन विचार निर्माण करतो, नवीन ज्ञानाची निर्मिती करतो, ते खरं ज्ञान होय. ते प्राप्त करणं हे हे ज्ञानार्जन होय.

खरं ज्ञान हे सर्जनशील असतं. म्हणून आपल्या ज्ञानसाधनेचं उद्दिष्ट केवळ ज्ञानवाहक

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मराठी अभ्यास परिषद

न बनता, ज्ञानाचा संग्रह करून नवज्ञानाची निर्मिती करणं हे असलं पाहिजे. पण प्रसार-माध्यमांच्या अखंड वर्षावामुळं ही प्रक्रिया संपूर्ण होऊ शकत नाही. सामान्य माणूस ग्राहका-चीच भूमिका बजावत राहतो.

मिळत असणाऱ्या ज्ञानावर ही सर्जनात्मक प्रक्रिया करण्याचं प्रशिक्षण देण्याचं काम खरं तर शिक्षणसंस्थांचं आहे. पण आजकाल त्यांचंच स्वरूप पालटलं आहे. त्यामुळं या प्रशिक्षणाकडे त्यांचं दुर्लक्ष होत आहे. या शिक्षणसंस्था फक्त माहितीच्या वितरणाची व्यवस्था बघणाऱ्या संस्था झाल्या आहेत. विद्यार्थ्यांना ठरावीक काळात ठरावीक मर्यादेचं ज्ञान देणं, शेवटी त्यातलं त्यांनी किती स्मरणात ठेवलं, याची परीक्षा घेणं यावर त्यांचा भर असतो. त्या ज्ञानावर परस्परान्वयाचे संस्कार करणं, सर्जनाचे संस्कार करणं याचं प्रशिक्षण तिथं मिळेनासं झालं आहे. सर्व शिक्षण परीक्षाकेंद्री झाल्यानं परीक्षेला आवश्यक तेवढंच शिकवायचं, परीक्षेत उपयोगी पडेल, असा मजकूर तयार टिपणांच्या रूपानं लिहून द्यायचा, हे सध्याच्या शिक्षणाचं स्वरूप आहे. हे कमी पडतं, म्हणून भरीला तयार उत्तरांचा पुरवठा करणारी मार्गदर्शक पुस्तकं, खाजगी वर्ग आहेतच. या सबंध वातावरणात विद्यार्थी कायमचा ग्राहकाच्याच भूमिकेवर राहतो. त्याला स्वतंत्र विचार करायला संधीच मिळत नाही. विद्यार्थी पाठांतराच्या जोरावर चांगले गुण मिळवतो; पण सर्जक ज्ञानापासून वंचित राहतो. बी. ए., एम्. ए. यांसारख्या पदव्या चांगले प्रकारे मिळवूनही विद्यार्थ्याला स्वतःच्या विषयावर आत्मविश्वासानं चार शब्द बोलता येत नाहीत, की पाच-सहा ओळींचा मजकूर सुसंगतपणे लिहिता येत नाही.

याच्या उलट पाश्चात्त्य विद्यार्थ्यांचा अनुभव येतो. महाराष्ट्राची संस्कृती आणि मराठी भाषा यांचा अभ्यास करण्याच्या निमित्तानं दरवर्षी अमेरिकन विद्यार्थ्यांचं एक पथक पुण्यात येत असतं. या विद्यार्थ्यांना येथील सहा महिन्यांच्या वास्तव्यात एक छोटासा संशोधन-प्रकल्प घेऊन त्यावर एक प्रबंधिका सादर करावयाची असते. त्या तपासण्याचा योग अनेक वेळा आला. पदवीच्या वर्गात शिकत असलेले हे विद्यार्थी ज्या शिस्तीनं माहिती गोळा करतात, गोळा केलेल्या माहितीचं विश्लेषण करतात. आणि विशिष्ट सूत्रानुसार तिची पुन-र्मांडणी करतात, ते पाहताना कौतुक वाटतं. आमच्या एम्. फिल्.च्या विद्यार्थ्यांमध्येही ही संशोधनाची शिस्त आढळून येत नाही. याचं श्रेय त्यांच्याकडील शिक्षणपद्धतीला द्यावं लागेल. मिळालेल्या माहितीवर मनन, चिंतन, चर्चा, तिचं पुनर्व्यवस्थापन, नवीन विचाराचं प्रस्थापन यांतून त्यांची ज्ञानार्जनाची प्रक्रिया चालू असते. आमच्या विद्यार्थ्यांना ही संधी नाकारली जाते आहे, ही चिंतेची बाब आहे.

सुदैवाची गोष्ट अशी, की आपल्या या शिक्षणपद्धतीतील उणिवा शिक्षणशास्त्रज्ञांना उमगल्या आहेतच; पण आता विद्यार्थ्यांनाही त्या उमगू लागल्या आहेत. मुंबई उच्च

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मराठी अभ्यास परिषद

माध्यमिक परीक्षामंडळाच्या बारावीच्या परीक्षेत सर्वप्रथम आलेल्या विपुल भगवान देवकरचे हे उद्गार पहा,

"आपल्याकडचं शिक्षण–विशेषतः परीक्षा या निव्वळ घोकंपट्टीवर आधारल्या गेल्या आहेत. त्यात विचारांना, बुद्धीला कसलेच आव्हान मिळत नाही." (महाराष्ट्र टाइम्स १९९०.०६.१४)

ज्यावेळी ग्राहक चिकित्सक बनतो त्या वेळीं व्यापाऱ्याला सावध व्हावंच लागतं, या न्यायानं आपण आपल्या शिक्षणपद्धतीत परिवर्तन करायला लागलं पाहिजे.

कल्याण काळे

धोकादायक असमतोल

आजच्या जगामध्ये असंख्य घटना प्रचंड वेगाने घडत आहेत. माणसाला उपलब्ध असणारे ज्ञान फारच कमी वेळात कित्येक पटीने वाढत आहे; परंतु या सर्वांचे खरे महत्त्व माणूस एवढ्या कमी वेळात आकलन करू शकतो का? माणसाची विचार करण्याची, समजावून घेण्याची आणि गोष्टींचा परस्पर संबंध प्रस्थापित करण्याची प्रक्रिया आणि पद्धत अद्यापही तशीच राहिली आहे... घटनाक्रमाचा हा वाढलेला वेग आणि त्याचे आकलन करून घेण्याची मानवी क्षमता यामधील असमतोल धोकादायक आहे."

[प्रा. यशपाल, अध्यक्ष, विद्यापीठ अनुदान आयोग यांच्या पुणे विद्यापीठातील, 'आयुक्ता'तर्फे आयोजित व्याख्यानातून दै. सकाळ, पुणे दि० १९९०.०५.१६ या अंकातून उद्धृत.]

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मराठी अभ्यास परिषद

अनुक्रमणिका

भाषिक चुका आणि त्यांचे विश्लेषण

मिलिंद स. मालशे

१) प्रास्ताविक, २) बालभाषा आणि चुका, ३) प्रौढभाषा आणि 'आडचुका', ४) 'नियमबद्ध' चुका, ५) निजभाषा व परभाषा–तुलनात्मक विश्लेषण, ६) चुकांची कारणमीमांसा, ७) चुकांचे विश्लेषण आणि भाषाशिक्षण.

१

'चुकतो, तो माणूस, क्षमा करतो; तो देव, – अशा अर्थाचे वचन इंग्लिशमध्येआहे.' यातला दैवी भाग आपण सोडून देऊ. आणि चुकणे हे का, कसे व किती मानवी आहे, याचा विचार भाषेच्या संदर्भात करू.

कोणतीही गोष्ट शिकायची म्हटली, की त्या प्रक्रियेत शिकणाऱ्याकडून चुका घडतातच. आणि त्या सुधारत सुधारतच तो शिकत असतो. भाषा आत्मसात करणे ही तर माणसाच्या सामाजिक-सांस्कृतिक अस्तित्वासाठी अत्यावश्यक असणारी गोष्ट आहे. माणूस समाजाचा एक घटक बनण्याच्या प्रक्रियेचे–सामाजिकीकरणाचे–ते एक मूलभूत अंग आहे. या महत्त्वाच्या प्रक्रियेत शिकणाऱ्याच्या हातून घडणाऱ्या चुकांचे महत्त्व काय? या चुकांचे विश्लेषण होणे आवश्यक का आहे? हे विश्लेषण कसे करता येईल? आणि भाषाशिक्षणाच्या व विशेषतः शब्दकोशसिद्धीच्या दृष्टीने हे विश्लेषण महत्त्वाचे कसे ठरते? या प्रश्नांचा विचार येथे करायचा आहे.

२

बालपणी भाषा आत्मसात होते, ती साधारणपणे पहिल्या चार किंवा पाच वर्षांमध्ये होते.[२] थोडे अधिक नेमकेपणे बोलायचे, तर ही प्रक्रिया वयाचे १८ ते ४८ महिने या कालखंडात प्रामुख्याने घडून जाते. 'घडून जाते', असे म्हणायचे कारण असे, की कुटुंबात व भोवतालच्या समाजात व्यवहार ज्या भाषेत चालला असेल, ती भाषा लहान मूल अत्यंत स्वाभाविकपणे उचलते. या भाषेचे– म्हणजे ती बोलायचे– शिक्षण कोणी द्यावे लागत नाही. आजूबाजूचा व्यवहार दोन वा तीन भाषांत चालत असेल, तर या दोन वा तीन भाषाही या वयात विनासायास. विनाशिक्षण आत्मसात होतात. त्यातही महत्त्वाची गोष्ट म्हणजे, निजभाषा आत्मसात होण्याच्या या प्रक्रियेचा साक्षरता, शिक्षण, सामाजिक-सांस्कृतिक पातळी, बौद्धिक कुवत, तसेच मनाचा कल. यांसारख्या गोष्टींशी संबंध असलेला आढळत नाही. म्हणजे असे, की मूल जर अव्यंग असेल, तर त्याला १८ ते ४८ महिने या

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मराठी अभ्यास परिषद

वयात निजभाषा आत्मसात होतेच होते. ते मूल साक्षर समाजात वाढते आहे, की निरक्षर समाजात, त्याचा बुद्‌ध्यंक काय, वगैरे बाबी या संदर्भात पूर्णपणे अप्रस्तुत ठरतात.

निजभाषा आत्मसात होण्याची ही प्रक्रिया घडत असताना लहान मूल जी भाषा वापरते, ती काही प्रौढांच्या भाषेसारखी नसते. प्रौढांच्या भाषेच्या नियमानुसार बालभाषा ही 'चुकी'ची भाषाच म्हणावी लागेल. बालभाषेतील प्रमुख टप्पे आपण या दृष्टिकोनातून तपासू.

पहिल्या– म्हणजे पूर्वतयारीच्या टप्प्यात (सुमारे एक ते दीड वर्षापर्यंत) हसणे, रडणे, वेगवेगळे आवाज काढणे यांतून वागींद्रियांच्या स्नायूंवर प्रभुत्व प्राप्त होते. या टप्प्यातले विविध आवाज म्हणजे 'भाषा' नव्हे, तर भाषेच्या उच्चारणासाठी लागणारी जी स्नायुगत कौशल्ये आवश्यक असतात, ती प्राप्त करून घेण्याचा हा टप्पा असतो. सुमारे दीड वर्षांपासून जो दुसरा टप्पा सुरू होतो, त्यात शब्दोच्चारण सुरू होते :

१) दुद् किंवा दुद्दू
२) भुभू किंवा भुम्भू
३) मम्मं
४) बब्बा किंवा बाब्बा

हे शब्द प्रौढांच्या दृष्टीने अर्थातच चुकीचे असतात, पण आपण त्यांना चुका न म्हणता बोबडे, चिमखडे बोल म्हणतो. हे ध्यानात घेण्यासारखे आहे. या बाबतीतली महत्त्वाची गोष्ट अशी, की बालभाषेचे स्वतःचे असे नियम असतात. मात्र दीड ते चार वर्षे या वयात ते झपाट्याने बदलत असतात. वर उल्लेखिलेली (१) ते (४) ही उदाहरणे म्हणजे केवळ सुटे शब्द नसून ती एकेरी शब्दांची वाक्येच होत. सुरांचे वेगवेगळे चढउतार (intonation), आघात (stress), वर्णाची पुनरावृत्ती, यांचाही प्रयोग या उद्‌गारांत होत असतो. आणि विशिष्ट संदर्भावरून या एकेरी उद्‌गारांचे अर्थही आपण लावू शकतो. उदाहरणार्थ,

१) 'दुदू' म्हणजे 'दूध हवंय्.'
२) 'भुभू' म्हणजे 'मला एक प्राणी दिसतोय्.'
३) 'मम्मं' म्हणजे 'जेवण दे.'
४) 'बब्बा' म्हणजे 'बाबाकडे ने.'

प्रत्येक मूल या प्रकारच्या उद्‌गारांचा वापर नियमितपणे करीत असल्यानेच हे अर्थ आपण लावू शकतो. नियम मनात बांधणे आणि प्रत्यक्ष वापरामध्ये त्या नियमांचा पडताळा पाहणे, या प्रक्रियेची सुरुवात येथे झालेलीच असते. बालभाषेचा तिसरा टप्पा पाहिला, तर

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मराठी अभ्यास परिषद

आत्मसातीकरणाच्या प्रक्रियेचे हे स्वरूप अधिकच प्रकर्षाने जाणवते.

५) ' बाब्बा तोपी ' म्हणजे ' ही बाबाची टोपी आहे ' किंवा ' बाबाने टोपी घातली आहे. '

६) ' मम्मं शंऽऽप ' म्हणजे ' जेवण संपलं ' किंवा ' माझं जेवण झालं. '

७) ' तोतो नत्तो ' म्हणजे ' मला आंघोळ करायची नाही. '

८) ' दुदू हाय ' म्हणजे ' दूध गरम आहे ' किंवा ' आज मी दूध पिणार नाही. '

या टप्प्यामध्ये उद्देश्य–विधेय अशी रचना आत्मसात झाल्याचे दिसून येते. भाषेचे ध्वनी, शब्द आणि वाक्यरचना या सर्व पातळ्यांवर येथे चुका घडत असतात. परंतु नियमांची बांधणीही मनात चालू असते, हे निश्चित. नियम बांधणे व त्यांचा पडताळा पाहणे, या प्रक्रियेतूनच प्रौढ भाषेच्या व्याकरणाच्या जवळपास येणारी व्याकरणव्यवस्था वयाच्या चौथ्या-पाचव्या वर्षापर्यंत तयार होते आणि स्थिरावते.

प्रौढभाषेशी तुलना करता बालभाषा ही अर्थातच लघुभाषा असते. कारण तिचा शब्द-संग्रह आणि नियमव्यवस्था दोन्ही तोकडी असतात. परंतु मूलतः तिचे स्वरूप नियमबद्ध असते, हे नाकारता येणार नाही. मानवी भाषेचे व्याकरण अत्यंत गुंतागुंतीचे असूनही वयाच्या पहिल्या चार–पाच वर्षांमध्ये आश्चर्यकारक अशा वेगाने अव्यंग असलेले प्रत्येक मानवी मूल निजभाषा आत्मसात करते.

३

निजभाषा आत्मसात झाल्यानंतर म्हणजेच प्रौढभाषेचे व्याकरण मनात स्थिरावल्यानंतर, प्रौढपणी जो भाषिक व्यवहार आपण या भाषेत करतो, तोही पूर्णपणे बिनचूक असतो, असे म्हणता येणार नाही. मात्र या चुकांचे स्वरूप बव्हंशी प्रासंगिक असते. एखाद्या प्रसंगी आपण घाईत असलो किंवा मानसिक दडपणाखाली असलो, तर आपल्या हातून (–खरे तर, तोंडून–) भाषिक चुका होतात. पुढील उदाहरणे पाहा : [३]

(९) * डॉक्टर आले आणि बघाले...
(... आणि त्यांनी बघितलं...)

(१०) * कोणतीही भाता शिकत असताना...
(... भाषा ...)

नेहमीच्या भाषिक व्यवहारात आपण अनेकदा अडखळतो, अं– अं करतो, त्याच-प्रमाणे अनवधान, निष्काळजीपणा, दमछाक, घाई किंवा मानसिक ताण, या कारणांमुळे अनेक प्रकारचे अशुद्ध प्रयोग आपल्या तोंडून ' चुकून ' होत असतात. दुसरा माणूस बोलत असताना आपल्या ऐकण्यामध्ये जसे घोटाळे होऊ शकतात; आणि केवळ बोल-

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मराठी अभ्यास परिषद

तानाच नव्हे, तर लेखनातही असा प्रकार काही वेळा घडू शकतो :

(११) * चौदात्री आंतर–भारतीय भाषाविज्ञानिक परिषदेत त्यांनी निबंध वाचला.
(चौदाव्या...)

भाषिक व्यवहार थोडा अधिक काळजीपूर्वक, सावकाश, भाषेचे अवधान राखून केला, तर मराठीच्या कोणत्याही निजभाषिकाला या प्रकारच्या गफलती टाळता येतील. निदान लक्षात आणून दिल्यावर निजभाषेतील गफलती प्रत्येकजण सुधारू शकतो. शिवाय तीच गफलत त्याच माणसाच्या हातून पुन्हा पुन्हा घडत राहिली, तर तिला खरे पाहता मनोविश्लेषणाच्या दृष्टीने महत्त्व प्राप्त होत होऊ शकेल, पण भाषाविज्ञानाच्या दृष्टीने मात्र तिला फारसे अर्थपूर्ण मानता येणार नाही.

खरे म्हणजे, निजभाषेत घडणाऱ्या या प्रकारच्या गफलतींना चुका म्हणण्यापेक्षा 'आडचुका' म्हणजे अधिक योग्य ठरेल. शब्दसंग्रह किंवा व्याकरणव्यवस्था यांच्या लघुत्वामुळे किंवा अज्ञानामुळे काही या चुका घडलेल्या नाहीत. भाषेचे नियम आत्मसात होऊनही आणि शब्दसंग्रह पुरेसा असूनही काही स्वभाववैशिष्ट्यांमुळे किंवा प्रासंगिक कारणांमुळे घडणाऱ्या 'प्रयोगामधील आडचुका किंवा गफलती' (Performance iapses) असे त्यांचे वर्णन करता येईल.

४

निजभाषेव्यतिरिक्त इतर भाषांमध्ये व्यवहार करण्याचे अनेक प्रसंग येतात. भारतासारख्या बहुभाषिक देशात व विशेषतः शहरी भागात राहणाऱ्यांवर असे प्रसंग अनेकदा येतात. किंबहुना त्या दडपणाखाली परभाषा शिकणेही भाग पडते. अमराठी भाषक मराठी बोलताना अनेक चुका होत असतात. अशा भाषकांचे पुढील मराठी प्रयोग पाहा :

(१२) * मी असा माहिती गोळा केला.
(१३) * मी तुमचं निरोप घेतो.
(१४) * आमचं सरनी मला कविता शिकवला.

या भाषकांना मराठीचे शब्द माहिती आहेत, त्यांचा क्रम माहिती आहे, परंतु वाक्यरचनेचे नियम पूर्णपणे आत्मसात झालेले नाहीत. ही वाक्ये बोलणारे पुरुष होते, हे लक्षात घेतले, तर येथे एक प्रकारची सुलभीकरणाची प्रक्रिया नियमितपणे घडते आहे, असे म्हणता येईल. कर्ता पुल्लिंगी व म्हणून सर्व वाक्यभर पुल्लिंगी प्रयोग, असा नियम येथे दिसतो, कारण केवळ धातुरूपेच नव्हे, तर कर्माची दर्शक विशेषणेसुद्धा पुल्लिंगी आहेत. मराठीतील नामांचे पुल्लिंगी, स्त्रीलिंगी व नपुसकलिंगी असे वर्गीकरण, भूतकाळासाठी कर्मणी रचना इत्यादी व्याकरणिक नियम–उपनियम येथे मोडलेले आहेत, आणि एकच नियम सरधोपट-

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मराठी अभ्यास परिषद

पणे लावलेला आहे, किंवा अतिव्याप्त केलेला आहे; म्हणजे विशिष्ट नियमांचा वापर केल्यानेच चूक होते आहे. अशा प्रकारच्या चुकांना आपण 'नियमबद्ध चुका' (systematic errors) म्हणू. 'नियमबद्ध चुका' हा शब्दप्रयोग वरवर पाहता आत्म-व्याघाती वाटण्याचा संभव आहे. कारण चूक होते, ती नियम मोडल्यामुळे, असे सर्व-साधारणपणे मानले जाते. परंतु मराठीचे प्रौढ निजभाषक जी नियमव्यवस्था वापरतात तीच अतिसुलभ बनवून तिचा वापर करण्याची प्रवृत्ती परभाषा शिकण्याच्या प्रक्रियेत आढळते. या सुलभीकृत किंवा संक्षेपित नियमव्यवस्थेमुळे नियमितपणे ज्या चुका होतात त्या नियमबद्ध चुका होत.

मराठीचा निजभाषक बनत असताना लहान मूल ज्या चुका करते त्यांच्यापेक्षा या चुका काहीशा वेगळ्या आहेत. अर्थात लहान मूलही काही नियम वापरूनच भाषिक व्यवहार करू पाहते, हे आपण वर पाहिले आहे. परंतु बोबड्या, चिमखड्या बोलांची भाषिक अवस्था फार झपाट्याने बदलत जाते. एकाक्षरी शब्द, एकेरी शब्दांची वाक्ये, दुहेरी व तिहेरी शब्दांची वाक्ये– इत्यादी टप्पे पार करून मूल इतक्या झपाट्याने प्रौढ-भाषेच्या अवस्थेपर्यंत प्रगती करते, की त्याची तुलना पुढील वयात होणाऱ्या भाषाशिक्षणाशी होऊ शकणार नाही. दुसरे म्हणजे, भाषा आत्मसात होत असताना लहानपणी अनेक प्रकारच्या संकल्पनाही आत्मसात होत असतात. म्हणजेच मुलाची बौद्धिक व मानसिक वाढ होत असते. पुढील वयात या वाढीचा वेग कमी होत जातो.

द्वितीय भाषा किंवा परभाषा शिकताना नवे - म्हणजे निजभाषेचे वेगळे- नियम ग्रहण करणे शिकणाऱ्याला भाग पडते. पूर्णाकारी भाषिक व्यवस्था स्थिर होईपर्यंत शिकणाऱ्याला अपूर्ण व्यवस्थेच्या विविध टप्प्यांतून जावे लागणार, हे उघड आहे. या मधल्या टप्प्यांना 'आंतरभाषा' किंवा 'आंतरव्यवस्था' म्हणता येईल.[४] 'आंतरभाषा' या संकल्पनेचा वापर निजभाषेपेक्षा प्रौढांच्या परभाषेच्या संदर्भात का केला जातो. हे आधीच्या विवेचना-वरून स्पष्ट व्हावे.

५

'आंतरभाषा' किंवा 'आंतरव्यवस्था' ही संकल्पना आणखी एका दृष्टीनेही फार मोलाची आहे. द्वितीय भाषा व परभाषा प्रौढ वयात आपण शिकू लागतो, तेव्हा आपल्या निजभाषेचा संदर्भ या शिकण्याला असतोच. त्यामुळे निजभाषा आणि 'साध्यभाषा' (म्हणजे जी हस्तगत करायची आहे, ती भाषा– target language) या दोन भाषिक व्यवस्थांच्या अधले-मधले बरेच टप्पे आपल्याला ओलांडावे लागतात. या मधल्या टप्प्यांवर असताना अर्थातच चुका घडत असतात. शिवाय पहिल्या चार–पाच वर्षांच्या कालखंडानंतर पुढच्या काळात भाषा अवगत होण्याची प्रक्रिया खूपच मंदावते आणि त्यामुळे द्वितीय भाषा वा परभाषा निजभाषेसारखी अवगत होणे जवळ–जवळ अशक्य

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मराठी अभ्यास परिषद

असते. पूर्णाकारी साध्यभाषेपर्यंत न पोहोचता आंतरभाषेच्या एखाद्या टप्प्यावर विद्यार्थ्यांची प्रगती खुंटते, आणि अशा खंडित व्यवस्थेच्या साहाय्यानेच तो भाषिक व्यवहार करू पाहतो. भाषिक चुकांचा विचार या संदर्भात अत्यंत महत्त्वाचा ठरतो.

आंतरभाषेवर निजभाषेचा इतका खोलवर परिणाम होत असतो, की साध्यभाषेच्या पूर्णाकारी नियमव्यवस्थेतील कोणते नियम ग्रहण करायचे, याची निवडही अनेकदा निज-भाषेच्या चाळणीतून होत असते. ध्वनींच्या किंवा स्वनांच्या पातळीवरील उदाहरणे घ्यायची, तर प्रथम महाप्राण या स्वनवैशिष्ट्याचा उल्लेख करता येईल. द्रविडी भाषांमध्ये महाप्राण स्वनिमिक नसल्यामुळे (म्हणजे महाप्राणयुक्त व महाप्राणहीन वर्ण अर्थभेद व्यक्त करीत नसल्यामुळे[५]) मराठीमधील /ट ठ/ ड–ढ/, /त–थ/, /द–ध/, इत्यादी स्वनिमिक भेद ग्रहण करणे या भाषकांना अवघड जाते :

(१५) पाट–पाठ, पाडा–पाढा, तवा–थवा

यांसारख्या जोड्यांमधील भेद अनेकदा ऐकू येणेही अवघड होते व त्यामुळे या भेदांचा वापरही ते करू शकत नाहीत. यातून अर्थातच उच्चारातील चुका होतात.

मराठी निजभाषा असणारा प्रौढ माणूस जेव्हा इंग्रजी शिकतो, तेव्हा /स्ट/ या जोड-व्यंजनाचा उच्चार त्याला खूपच जड जातो, कारण मराठी भाषेच्या स्वनिमिक प्रक्रियांमध्ये हे जोड-व्यंजन आढळत नाही. त्यामुळे /स्ट/ ऐवजी /ष्ट/ वापरून

(१६) स्टेशन, सिष्टर, आगष्ट

यांसारखे चुकीचे प्रयोग त्याच्या तोंडून होतात. हिंदी भाषकांकडून **school, station** यासारख्या इंग्रजी शब्दांचा उच्चार एकतर /इस्कूल/इस्टेशन/असा होतो किंवा /सकूल/, /सटेशन/ असा होतो. /स्ट/ हे जोड–व्यंजन शब्दाच्या अग्रस्थानी टाळण्या-साठी एकतर /इ/ हा स्वर वापरणे किंवा /स/ हे व्यंजन स्वरासहित उच्चारणे, ही प्रवृत्ती येथे दिसते. असे म्हणता येईल. ही व्यंजनांची उदाहरणे होत. स्वर–स्वनिमांचे उदाहरण घ्यायचे तर र्‍हस्व–दीर्घत्वाचा उल्लेख करता येईलः /इ–ई/ आणि /उ–ऊ/ हे भेद आपण बारा-खडीत शिकत असलो, तरी या दोन स्वरांचे र्‍हस्व–दीर्घत्व मराठीत स्वनिमिक नाही. त्यामुळे

(१७) fill–feel, sit–seat

(१८) full – fool, pull–pool

यांसारख्या शब्दांच्या उच्चारातला र्‍हस्व–दीर्घत्वाचा भेद आत्मसात होऊ शकत नाही व त्यातून अनेक चुका होताना आढळतात.

वर्णांच्या उच्चारणाबरोबरच परभाषेची इतर उच्चारणवैशिष्ट्ये आत्मसात करतानाही

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मराठी अभ्यास परिषद

अशा अडचणी येतात. इंग्लिशमध्ये प्रत्येक शब्दात आघात विशिष्ट अक्षरावर येतो, आणि आघातयुक्त व आघातहीन अक्षरांच्या विशिष्ट रचनेतून त्या भाषेची लय निर्माण होते. विशेषतः अनौपचारिक संभाषणामध्ये बिनमहत्त्वाच्या शब्दांची दुर्बल रूपे मोठ्या प्रमाणावर वापरली जातात. जसे :

(१९) a या उपपदासाठी अ
and साठी अन्
as साठी अज्
than साठी दन्
that साठी दट्
will आणि shall यांच्यासाठी इल् किंवा ल्, इत्यादी.

बोलताना सर्वच ठिकाणी बलयुक्त रूपे वापरली तर भाषेची लय बिघडून जाईल ही गोष्ट उघड आहे. आपण मराठी भाषिक इंग्लिश बोलताना वरील दुर्बल रूपे किती वापरतो, याचा पडताळा ज्याचा त्याने घ्यावा. मराठीची लय ही बल किंवा आघात यांपेक्षा स्वर ऱ्हस्व–दीर्घत्वावर किंवा लघुगुरुत्वावर अवलंबून असल्याने इंग्लिशच्या लयीपेक्षा ती खूपच भिन्न आहे व त्यामुळे याबाबतीतल्या चुका होतात, असे म्हणता येईल.

निजभाषेचे नियम परभाषेवर लादल्यामुळे उच्चारांमध्ये जशा चुका होतात, तशाच भाषिक व्यवस्थेच्या इतर पातळ्यांवरही होत असतात. उदाहरणार्थ, तामिळ व मल्याळी भाषकांनी केलेल्या पुढील रचना पाहा :

(२०) * तुम्ही येताकी थांबताकी ?
(२१) * तू काय घेणार ? चहाका कॉफीका ?

निजभाषेमध्ये 'किंवा' या अर्थाने येणारे रूप हे प्रत्यय असल्याने आणि ते 'क्षकी यकी' / 'क्षवा यवा' / 'क्ष किंवा य किंवा' असे संस्कृतमधील 'वा' आणि 'नु' यांच्या धर्तीवर (उदाहरणार्थ, 'नरो वा कुंजरो वा') वापरले जात असल्याने ही चूक घडली असावी.

मराठीमधील 'आपण' व 'आम्ही' हा भेद लक्षात न आल्याने पुढील चूक घडलेली आहे, हे उघड आहे :

(२२) * आम्ही जाऊ या.

मराठीमध्ये प्रथमपुरुषी बहुवचनी सर्वनामे दोन आहेत; ज्याला उद्देशून आपण बोलत आहोत त्याचा अंतर्भाव करायचा असल्यास 'आपण' आणि नसल्यास 'आम्ही', असा हा भेद आहे :

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मराठी अभ्यास परिषद

(२२) आपण (= तुझ्या/तुमच्यासह) सहलीला गेलो होतो.
(२४) आम्ही (=तुझ्या/तुमच्याविना) सहलीला गेलो होतो.

द्रविडी भाषकांकडून (२२) मधील चूक सहसा घडत नाही, हे नोंद घेण्यासारखे आहे. या भाषांमध्ये वर उल्लेखिलेला भेद अस्तित्वात आहे, व त्यामुळे या भाषांच्या निजभाषकांना त्या बाबतीत अडचण येत नाही, असे याचे कारण सांगता येईल.

इंग्लिशमधील marry हा धातू वापरताना मराठी भाषकाची होणारी चूक ठरावीक स्वरूपाची असते :

(२५) * He married **with** her

मराठीमधील '—च्या बरोबर/—च्या शी लग्न करणे', या रचनेच्या प्रभावामुळे वरील चूक झालेली आहे, हे उघड आहे. वस्तुत, इंग्लिशचे निजभाषक marry हे क्रियापद शब्दयोगी अव्ययाशिवायच वापरतात :

(२६) He married a rich girl

'लग्न लावणे' या प्रयोजन अर्थानेही हाच धातू इंग्लिशमध्ये वापरला जातो.

(२७) The old priest married the couple.

काही वेळा प्रयोजक धातू marry somebody **to** somebody else अशा रचनेत शब्दयोगी अव्ययासह येऊ शकतो :

(२८) Her mother wants to marry her to a rich man.

इंग्लिशमध्ये marry into, marry off या रचना शक्य आहेत, पण with चा वापर मात्र चुकीचा आहे.

मराठीच्या नियमांच्या प्रभावामुळे घडलेल्या काही चुकांची आणखी काही उदाहरणे पाहा :

(२९) * take **disadvantage** of...... चा गैरफायदा घेणे
[योग्य रचना : take advantage of किंवा take undue advantage of]

(३०) * **do** an arrangement
व्यवस्था करणे.

[योग्य रचना : make an arrangement]

(३१) * My friend **took** divorce last week.
माझ्या मित्राने गेल्या आठवड्यात घटस्फोट घेतला.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मराठी अभ्यास परिषद

[योग्य रचना : My friend got / obtained divorce last week.]
इंग्लिशमधील take and give a test यांचा वापर करताना मराठी भाषकांचा अधिकच गोंधळ उडतो. कारण परीक्षा घेणे व देणे याचे मराठीतील अर्थ अगदी उलट आहेत.

(३२) ★ He was telling to his friends some stories.
-ला ... सांगणे
[योग्य रचना : He was telling his friends some stories. किंवा He was telling some stories to his friends.)

(३३) ★ Amitabh Bacchan's some movies ...
अमिताभ बच्चनचे काही चित्रपट
[योग्य रचना : Some of Amitabh Bacchan's movies ...]

(३४) ★ I am not hearing you very well.]
मला तुझं बोलणं नीट ऐकू येत नाहीये.
[योग्य रचना : I can't hear you very well.

इंग्लिशमध्ये hear, see, smell, taste यांसारखे संवेदनावाचक धातू (verbs of perception) अपूर्ण काळाच्या वाक्यरचनांमध्ये वापरता येत नाहीत. या प्रकारचे इतर काही धातू पुढीलप्रमाणे : dislike, hate, like, live, want; astonish, surprise; believe, doubt, guess, know, remember, understand.]

(३५) ★ Gandhiji were great leader.
गांधीजी मोठे पुढारी होते.
[योग्य रचना : Gandhiji was a great leader.]

(३६) ★ If he comes, then I shall go.
तो जर आला, तर मी जाईन.
[योग्य रचना : If he comes, I shall go]

(३७) ★ When he comes, then I shall go.
तो जेव्हा येईल तेव्हा मी जाईन.
[योग्य रचना : When he comes, I shall go.)

(३८) ★ He scored few runs.
त्याने (अगदी) थोड्या धावा केल्या.
[योग्य रचना : He scored only a few runs. किंवा He scored very few runs.)

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मराठी अभ्यास परिषद
अनुक्रमणिका

(३८) मधील वाक्याबाबत पुढील स्पष्टीकरण आवश्यक आहे. इंग्लिशमध्ये few आणि a few यांमधून एक सूक्ष्म भेद व्यक्त केला जातो: a या उपपदाशिवाय few हा शब्द वापरला. तर त्यातून काहीसा नकारात्मक अर्थ व्यक्त होतो. उलट, उपपदासह a few ही रचना अधिक होकारात्मक अर्थ व्यक्त करते; few म्हणजे नगण्य, अपेक्षेपेक्षा कमी, तर a few म्हणजे थोडासा, अपेक्षेपेक्षा अधिक. अगदी असाच भेद little आणि a little यांमध्ये आहे. पुढील उदाहरणे पाहा :

(३९) (अ) I have little interest in cricket.
(आ) I have a little interest in cricket.

(४०) (अ) This is a difficult theory; few people understand it.
(आ) This is a difficult theory, but a few people understand it.

काही वेळा निजभाषेतील वाक्प्रचारही साध्यभाषेवर लादले जातात व त्यातून साध्यभाषेच्या वापरात चुका होतात. पुढील इंग्लिश वाक्यातील दुहेरी चूक पाहा :

(४१) ⋆ He tried to pull my legs.
('प्रगतीमध्ये अडथळे निर्माण करणे'– या अर्थाने)

'एखाद्याचे पाय ओढणे', या मराठी वाक्प्रचाराचे शब्दशः भाषांतर केल्याने एक म्हणजे legs हे रूप मराठीत 'पाय' या अनेकवचनी रूपामुळे आलेले आहे (pull their legs शक्य आहे, पण pull my legs मात्र चूक आहे); परंतु त्याहीपेक्षा महत्त्वाची चूक म्हणजे pull someone 's leg या इंग्लिश वाक्प्रचारावर भलताच अर्थ लादला गेला आहे; इंग्लिश वाक्प्रचाराचा अर्थ 'एखाद्याची गंमत करणे' किंवा 'एखाद्याला गमतीने फसवणे', असा होतो.

या सर्व चुकांच्या बाबतीत काही मुद्दे ध्यानात ठेवायला हवेत. एक म्हणजे, साध्यभाषेच्या अज्ञानामुळे त्या निर्माण झालेल्या आहेत, एवढीच कारणमीमांसा पुरेशी ठरणार नाही. या प्रत्येक उदाहरणामध्ये विशिष्ट स्वरूपाचा नियम वापरूनच वाक्यरचना करण्यात आलेली आहे; परंतु साध्यभाषेच्या नियमांपैकी हा नियम नाही. दुसरे म्हणजे, बोलणाऱ्याच्या निजभाषेच्या नियमांशी खूप जुळणारा हा नियम आहे.

आणखी एका वादग्रस्त मुद्याचा उल्लेख येथे करायला हवा. वर इंग्लिशच्या संदर्भात जी चुकांची उदाहरणे दिली आहेत, त्या चुका केवळ मराठी भाषकाकडूनच होतात, असे नव्हे. वरील उदाहरणांपैकी अनेक चुका अखिल भारतीय स्वरूपाच्या आहेत, असे म्हणता

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मराठी अभ्यास परिषद

येईल, इतकेच नव्हे तर त्यातल्या काही बहुसंख्य सुशिक्षित भारतीयांच्या बोलण्यात अनेकदा आढळतात. असे जर असेल तर त्यांना 'चुका' का मानायचे, हा प्रश्न साहजिकपणे उभा राहतो. काही अभ्यासकांनी 'भारतीय इंग्लिश' या कल्पनेचा पुरस्कार केलेला आहे, आणि वर उल्लेखिलेल्या काही प्रयोगांना अर्थातच या संकल्पनेत स्थान मिळण्यासारखे आहे. या वादामध्ये आपण या ठिकाणी शिरणे योग्य ठरणार नाही, कारण तो स्वतंत्र लेखाचाच विषय आहे. मात्र येथे नोंदवून ठेवायला हवी अशी गोष्ट म्हणजे 'परभाषा', 'निजभाषा' इत्यादी संकल्पनांचा पुनर्विचारच या वादामुळे करावा लागतो. उदाहरणार्थ, जे भारतीय लहानपणापासून इंग्लिश बोलतात ते 'भारतीय इंग्लिश'चे निजभाषकच म्हणावे लागतील; निदान त्यांना त्या 'भाषे'चे परभाषक मानता येणार नाही. अर्थात हा प्रश्न खूपच गुंतागुंतीचा आहे, ही गोष्ट उघड आहे.

६

नियमबद्ध भाषिक चुकांच्या संबंधात आपण काढलेले हे निष्कर्ष बरोबर असतील, तर भाषांचा तुलनात्मक अभ्यास केल्याने चुकांच्या मागे कोणता नियम आहे, हे शोधण्यास खूपच मदत होईल, हे मान्य करायला हवे. या क्षेत्रातील काही अभ्यासकांनी[६] अशी भूमिका घेतलेली आहे, की संरचनेच्या दृष्टीने साध्यभाषा निजभाषेपासून जेवढी दूर तेवढी ती शिकायला अवघड. म्हणजेच ती शिकताना होणाऱ्या चुका अधिक. याउलट साध्यभाषा निजभाषेला संरचनात्मक दृष्ट्या जवळची असेल, तर ती शिकायला सोपी, म्हणजेच चुकांचे प्रमाण कमी. या भूमिकेमुळे तुलनात्मक भाषिक विश्लेषणाला (Contrastive Analysis) खूपच महत्त्व प्राप्त होते. भाषांची तुलना करून त्यांच्यांतील साम्यभेद शोधून काढले, की भाषिक चुकांविषयी नेमकी भाकिते करता येणेही शक्य आहे, असा विश्वास काही अभ्यासकांनी व्यक्त केलेला आहे.

या संदर्भातील मुख्य प्रश्न असा, की द्वितीय भाषा वा परभाषा शिकताना होणारी प्रत्येक चूक निजभाषेच्या प्रभावामुळेच होत असते, असे म्हणता येईल का? वर उल्लेखिलेल्या भूमिकेत तथ्य जरूर आहे. कारण निजभाषेच्या ज्ञानाच्या पार्श्वभूमीवरच आपण नवी साध्यभाषा शिकत असतो. परंतु भाषाभाषांतील 'साम्य' वा 'भेद' या संकल्पना वाटतात तेवढ्या सोप्या नाहीत. अभ्यासकांना असे दिसून आले आहे, की काही वेळा साम्यामुळेच अधिक गोंधळ उडून चुका होऊ लागतात; उलट, काही बाबतींत साध्यभाषा निजभाषेपेक्षा खूप भिन्न असल्यानेच शिकायला सोपी जाते. कारण तेथे निजभाषेच्या प्रभावाचा प्रश्नच उद्भवत नाही![७] यावरून एक गोष्ट स्पष्ट होते; ती म्हणजे, भाषिक चुका या निजभाषा व साध्यभाषा यांच्यांतील साम्यामुळे होतात, की भिन्नत्वामुळे होतात याविषयी अभ्यासकांमध्ये एकमत नाही. आपण एवढेच म्हणू की, निदान काही चुका निजभाषेच्या प्रभावामुळे होतात व त्यांच्या बाबतीत तुलनात्मक विश्लेषणाचा उपयोग होतो; मात्र सर्वच चुकांच्या

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मराठी अभ्यास परिषद

बाबतीत निजभाषेला जबाबदार धरणे योग्य ठरणार नाही.

मराठी द्वितीय भाषा किंवा परभाषा म्हणून शिकताना वेगवेगळ्या निजभाषा असणाऱ्या विद्यार्थ्यांकडून काही चुका हमखास होताना आढळतात. उदाहरणार्थ, पुढील रूपे पाहा :

(४२) * जाला (= गेला)
* करला (= केला)
* बघला (= बघितला)
* मिळला (= मिळाला)
* पीला (= प्यायला)

ज्या परभाषी विद्यार्थ्यांकडून या चुका झाल्या, त्यांनी मराठीचे दोन नियम आत्मसात केलेले आढळले. एक म्हणजे :

(४३) जा ——> जातो / जाते
कर ——> करतो / करते
बघ ——> बघतो / बघते
मिळ ——> मिळतो / मिळते
पी ——> पितो / पिते

ही वर्तमानकाळाची रूपे त्यांनी आत्मसात केलेली होती. तसेच भूतकाळातील 'लाख्यात' रूपेही त्यांनी शिकून घेतली होती :

(४४) बस ——> बसला
ने ——> नेला
टाक ——> टाकला
मार ——> मारला

आणि (४३) व (४४) या दोन नियमित रूपांच्या आधारेच (४२) मधील रूपे त्यांनी रचली होती, असे म्हणायला हवे :

(४२) जा ——> * जाला
कर ——> * करला
बघ ——> * बघला
मिळ ——> * मिळला
पी ——> * पीला

ही चुकीची रूपे खरे पाहता 'नियमित' रूपेच होत. परंतु मराठीमध्ये काही धातू-

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मराठी अभ्यास परिषद
अनुक्रमणिका

रूपांमध्ये अनियमितपणे बदल होतात :

(४५) जा ---> गे—
कर ---> के—
बघ ---> बघित—
मिळ ---> मिळा —
पी ---> प्याय—

हे बदल मात्र त्यांनी आत्मसात केलेले नव्हते. तेव्हा या चुकांच्या बाबतीत निजभाषेचा प्रभाव हे कारण नसून साध्यभाषेतील अनियमित रूपांविषयीचे अज्ञान, हे कारण म्हणता येईल.

पुढील वाक्यांतील[८] चुका पाहा :

(४६) ★ ... राज्यपाल–राष्ट्रपती हे कसलेही ताळतंत्र न वापरता सरकारे बरखास्त करतात.

(४७) ★ ... गेल्या पाच वर्षांत सात राज्यपाल नेमावे लागले, ही काही फार मोठी शोभेची गोष्ट नव्हे.

मराठीच्या निजभाषकाने त्याच्या शब्दसंग्रहामधील प्रत्येक शब्दाची खास वैशिष्ट्ये टिपलेली असतात. " ताळतंत्र " बरोबर " ठेवणे " वा " बाळगणे " तसेच " सोडणे ", ही क्रियापदे येऊ शकतात, ही नोंद झालेली असते; " शोभादायक " आणि " शोभेची" यांतला भेद नोंदला गेलेला असतो. मराठी परभाषा म्हणून शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत " शोभादायक " व " शोभेची " यांना एकाच अर्थाने वापरण्याची जी प्रवृत्ती दिसते तिला सुलभीकरणाची प्रवृत्ती म्हणायला हवी. " ताळतंत्र " या शब्दाच्या बाबतीतही कदाचित असे म्हणता येईल, की " तंत्र " आणि " ताळतंत्र " यांना एकाच वर्गात टाकून त्यांच्यापुढे " वापरणे " असे एकच क्रियापद वापरण्याची प्रवृत्ती येथे दिसते. साध्यभाषेचाच नियम अतिव्याप्त करून वापरल्यामुळे झालेल्या पुढील चुका पाहा :

(४८) ★ इथे किती गवत पिकलंय.

(४९) ★ इथे किती फुलं पिकली आहेत.

भात वगैरे पिकणाऱ्या धान्यांच्या जोडीला गवत आणि फुलंही आणल्याने येथे सुलभीकरण होते आहे, हे स्पष्ट आहे.

इंग्लिशमधील काही चुका पाहा :

(५०) ★ He found asleep child in the garden.
[योग्य रचना : He found a sleeping child in the garden.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मराठी अभ्यास परिषद

अनुक्रमणिका

इंग्लिशमध्ये asleep हे जरी विशेषण असले, तरी त्याचा प्रयोग नामाआधी करता येत नाही, तर केवळ विधेयपूरक म्हणून करता येतो : The child was asleep. उलट, main यासारखी काही विशेषणे फक्त नामाआधीच वापरली जाऊ शकतात; त्यांना विधेयपूरक म्हणून वापरता येत नाही : The **main** problem is that...]

(५१) ★ My friend divorced last week.

[योग्य रचना : My friend got divorced last week. किंवा My friend got a divorce last week. (२९) मधील वाक्याशी तुलना करता (५०) मधील चूक निजभाषेच्या प्रभावामुळे घडली आहे, असे म्हणता येणार नाही. इंग्लिशमध्ये divorce या क्रियापदाला प्रत्यक्ष कर्माची (direct object) अपेक्षा असते, व कर्म वापरायचे नसल्यास get a divorce किंवा get divorced या रचना वापराव्या लागतात.]

तेव्हा भाषिक चुकांचे विश्लेषण करताना निजभाषा आणि साध्यभाषा यांची तुलना काही बाबतींत महत्त्वाची ठरत असली, तरी केवळ तिच्यावर आपल्याला विश्लेषणासाठी विसंबून राहता येणार नाही. साध्यभाषेची नियमव्यवस्था अतिसुलभ करण्याची प्रक्रियाही चुकांच्या बाबतीत प्रस्तुत ठरते. मराठी नामांची लिंगव्यवस्था, तसेच सामान्यरूपांची व्यवस्था, या इतक्या गुंतागुंतीच्या आहेत, की त्यांच्या संदर्भातील चुका निजभाषेच्या प्रभावामुळेच विद्यार्थी करतात, असे म्हणणे योग्य ठरणार नाही.

भाषिक चुकांचे विश्लेषण करीत असताना अभ्यासकांनी अनेक प्रकारची तत्त्वे वापरून चुकांचे वर्गीकरण करण्याचा प्रयत्न केलेला आहे. चुकांच्या कारणांचा विचार करता काही चुका निजभाषेच्या प्रभावामुळे होतात; यांना 'आंतरभाषीय' (interlingual) चुका म्हणता येईल. काही चुकांचे स्वरूप 'विकासात्मक' (developmental) असते; निजभाषा शिकताना लहान मूल जशा चुका करते, त्या प्रकारच्या या चुका असतात. चुकांच्या वर्गीकरणाचा आणखी एक प्रकार हा त्यांच्या स्वरूपावर आधारलेला आहे. आवश्यक असलेला घटक गाळून टाकणे, अनावश्यक घटकाचा वापर करणे, चुकीची रूपे वा रचना वापरणे, आणि वाक्यरचनेमध्ये घटकांचा क्रम चुकीचा असणे, हे यांतील मुख्य प्रकार म्हणता येतील. 'फुटकळ' चुका आणि 'व्यापक' चुका असे आणखी एक वर्गीकरणही करता येते. वाक्यरचनेमध्ये एखाद-दुसरा, आणि तोही अर्थवहनाच्या दृष्टीने फारसा महत्त्वाचा नसलेला घटक चुकीचा वापरला गेला असेल, तर त्या चुकीला फुटकळ चूक म्हणता येईल; उलट वाक्याच्या समग्र रचनेमध्येच चूक घडत असेल, तर तिच्यामुळे अर्थवहनामध्ये खूपच अडथळा निर्माण होऊ शकतो; अशा चुकांना व्यापक चुका म्हणता येईल. आतापर्यंत आपण केलेल्या चर्चेमध्ये या सर्व प्रकारांची उदाहरणे आलेली आहेतच.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मराठी अभ्यास परिषद

भाषाध्यापनाच्या दृष्टीने हे वर्गीकरणाचे सर्व प्रकार फार महत्त्वाचे आहेत, ही गोष्ट उघड आहे. चूक व्यापक आहे, की फुटकळ आहे, आंतरभाषीय आहे, की विकासात्मक आहे, याचे विश्लेषण केल्यास अध्यापनाची सामग्री व पद्धती यांची निवड अधिक व्यवस्थितपणे करता येईल, याविषयी दुमत असू नये.

मराठी द्वितीय भाषा किंवा परभाषा म्हणून शिकत असताना ज्या चुका होतात, त्यांचे विश्लेषण होणे औपचारिक दृष्टीने फार महत्त्वाचे आहे. मराठी शिकवताना जी अध्यापन-सामग्री वापरली जाते, ती तयार करताना चुकांच्या विश्लेषणाचा संदर्भ लक्षात घेतला, तर या सामग्रीची उपयुक्तता वाढेल, यात शंका नाही.

भाषांचे अध्ययन-अध्यापन करताना साध्यभाषेचा शब्दकोश हे एक महत्त्वाचे साधन ठरते. हॉर्नबी यांनी **Oxford Advanced Learner's Dictionary of Current English** (यापुढील उल्लेख ALD) हा शब्दकोश तयार करून learner's dictionary म्हणजे 'परभाषिक विद्यार्थ्यांसाठी शब्दकोश' (- तांत्रिक संज्ञा तयार करायची, तर 'अध्येतालक्ष्यी शब्दकोश', असे म्हणता येईल-) ही संकल्पना अतिशय लोकप्रिय केली. या कोशानंतर **Longman Dictionary of Contemporary English** (यापुढील उल्लेख LDCE) आणि **Collins Cobuild English Language Dictionary** (यापुढे COBUILD) हेही त्याच प्रकारचे अधिक प्रगत असे शब्दकोश आता उपलब्ध आहेत.[१] परभाषिक विद्यार्थ्यांना इंग्लिश भाषा शिकताना येणाऱ्या समस्यांचा विचार करून व त्यांच्या चुकांचे स्वरूप लक्षात घेऊन या शब्दकोशांमध्ये विशिष्ट प्रकारच्या माहितीचा मुद्दाम अंतर्भाव केलेला आहे व त्यामुळे या कोशांचे स्वरूप पारंपरिक कोशांपेक्षा खूपच वेगळे आहे.

या संदर्भात एक उदाहरण घेऊ. इंग्लिशमध्ये person या नामाचे अनेकवचनी रूप persons असे होते; परंतु प्रत्यक्ष वापर पाहिला, तर बहुधा people हा शब्द अनेकवचनी रचनांमध्ये योजला जातो. इंग्लिशच्या निजभाषकाने persons आणि people यांमधील भेद सहजपणे टिपलेला असतो; परंतु परभाषकाला मात्र हे शब्द हमखास गोंधळात टाकतात. त्या दृष्टीने **LDCE** मधील people या शब्दाच्या वापराविषयीची नोंद उल्लेखनीय आहे :

The usual plural of **person** is **people; persons** is formal, and is used when they are considered more as numbers than as human beings ; **He was murdered by a PERSON or PERSONS unknown**

COBUILD या कोशाचे मुख्य वैशिष्ट्य असे, की यात शब्दाला प्रतिशब्द देऊन अर्थ दिलेला नाही, तर सोप्या इंग्लिशमध्ये वाक्यरूपाने अर्थाचे स्पष्टीकरण दिलेले आहे. या कोशातील marry या शब्दावरील पुढील नोंद पहा :

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मराठी अभ्यास परिषद

If you **marry** someone or if you **get married**, you form a legal relationship with a person of the opposite sex in a ceremony, during which you make particular promises to that person and become their husband or wife.

या कोशामध्ये प्रत्येक शब्द वाक्यात वापरून दाखविलेला तर आहेच, पण त्याबरोबर अर्थाचे स्पष्टीकरणही पूर्ण वाक्यात दिलेले आहे. इंग्लिश वाक्यरचनेचा अधिकात अधिक अनुभव विद्यार्थ्याला देणे, हा यामागचा हेतू आहे. परभाषक विद्यार्थ्याला नेमक्या कोठे अडचणी येतात, त्याच्या चुका होण्याचा संभव नेमका कोठे असतो, हे सर्व हेरून त्या दृष्टीने ही कोशसिद्धी होते आहे, ही गोष्ट उघड आहे.

मराठीमध्ये परभाषकांसाठी या प्रकारची अध्यापनोपयोगी वा कोशगत सामग्री फारशी उपलब्ध नाही. शब्दकोशामध्ये शब्दाच्या अर्थाबरोबरच त्याचे उच्चारण, त्याची व्याकरणिक जाती, वाक्यरचनात्मक वैशिष्ट्ये आणि उपयोजनविषयक माहिती (usage) यांची व्यवस्था लावणारा कोश किती उपयुक्त ठरू शकतो, याची कल्पना **ALD** आणि **LDCE** यांसारखे कोश प्रत्यक्ष वापरल्यावर सहज येते. मराठीच्या दृष्टीने या संदर्भात दोन-तीन उदाहरणे घेऊन मुद्दा स्पष्ट करता येईल.

म्हण, **बोल** व **सांग** हे धातू अर्थाच्या दृष्टीने काहीसे जवळचे आहेत. त्यामुळे एकाच प्रकारच्या वाक्यरचनेमध्ये त्यांचा उपयोग करण्याकडे परभाषक विद्यार्थ्याचा कल राहतो; नियमांचे सुलभीकरण करण्याच्या या प्रवृत्तीमुळे गोंधळ होऊन पुढील चूक घडलेली आहे :

(५२) ★ तो मला सांगला, की...

शब्दकोशामध्ये शब्दाच्या वाक्यरचनात्मक गुणधर्माची माहितीही अंतर्भूत केली, तर ते या दृष्टीने उपयुक्त ठरेल. उदाहरणार्थ, 'म्हण' हा धातू भूतकाळी रचनांमध्ये प्रथमान्त व तृतीयान्त अशा दोन्ही कर्त्यांसह वापरता येतो. उलट 'सांग' फक्त तृतीयान्त कर्त्याबरोबर, तर 'बोल' हा फक्त प्रथमान्त कर्त्याबरोबर भूतकाळातच वापरता येतो, अशी माहिती कोशात सोदाहरण ग्रथित करता येईल :

(५३) (अ) तो म्हणाला, की...
(आ) त्याने म्हटलं, की...

(५४) (अ) ★ तो सांगला, की...
(आ) त्याने सांगितलं, की...

(५५) (अ) तो बोलला, की...
(आ) ★ त्याने बोललं, की...

या तीन धातूंची तुलना केल्यास आणखी दोन गोष्टी जाणवतात. एक म्हणजे, 'बोल'

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मराठी अभ्यास परिषद

हा धातू अकर्मक व सकर्मक अशा दोन्ही प्रकारे वापरता येतो, तर ' सांग ' आणि 'म्हण' फक्त सकर्मकच आहेत. दुसरे म्हणजे, तिन्ही धातू सकर्मक रचनांत वापरता येत असले, तरी त्यांच्याबरोबर काही विशिष्ट कर्मेच येऊ शकतात. उदाहरणार्थ, **भाषा** (उदा. मराठी), **गाणे** व **गोष्ट** या तीन नामांचा कर्मस्थानी प्रयोग करायचा असला, तर **भाषा बोलणे, गाणे म्हणणे** व **गोष्ट सांगणे**, हे साहचर्य आत्मसात करणे आवश्यक आहे, आणि याचेही दिग्दर्शन कोशात सहज करता येण्यासारखे आहे.[१०]

दाते व कर्वे यांच्या **महाराष्ट्र शब्दकोशामध्ये**[११] **चांगला** हा शब्द ' विशेषण ' म्हणून दिलेला असून त्याचे पुढील तीन अर्थ दिलेले आहेत :

(अ) उत्तम, बरा, नीट...
(आ) भरभराटीचा, समृद्ध, सुखी...
(इ) नेहमीचा, रूढीस, साजेसा...

आता या नोंदीच्या आधारे मराठीत अनौपचारिक संदर्भात नेहमी वापरल्या जाणाऱ्या पुढील प्रयोगांचा अर्थ लागणार नाही :

(५६) गाडीत **चांगली** गर्दी होती.
(५७) मी **चांगलाच** घाबरलो.

तेव्हा ' खूप ' या अर्थाने **चांगला** हा शब्द आधुनिक मराठीत, विशेषतः अनौपचारिक वापरामध्ये, फार मोठ्या प्रमाणावर योजला जातो आणि तो विशेषण वा क्रियाविशेषण म्हणून येतो. या स्वरूपाची नोंद या शब्दाचे आकलन होण्याच्या दृष्टीने व त्याचा वापर करता येण्याच्या दृष्टीने चांगलीच उपयुक्त ठरेल ![१२]

परभाषा शिकत असताना उच्चारण, व्याकरण व अर्थ यांच्याबरोबरच भाषेच्या संदर्भनिष्ठ वापरासंबंधी (usage) स्पष्टीकरण मिळणे अत्यावश्यक ठरते, कारण या बाबतीत परभाषकाच्या चुका होण्याची शक्यता विशेष असते. स्थळ-काळानुसार, विषयानुसार बोलणारा व ऐकणारा यांच्यामधील संबंधानुसार भाषेची वेगवेगळी रूपे वापरावी लागतात. भाषेच्या संदर्भनिष्ठ अभ्यासाची (pragmatics) एक स्वतंत्र शाखाच आधुनिक भाषाभ्यासामध्ये स्थिरावते आहे व तिचा उपयोग भाषाशिक्षणाची सामग्री तयार करताना केला जावा, अशी अपेक्षा आता निर्माण होते आहे. केवळ व्याकरणदृष्ट्या बिनचूक नव्हे, तर उपयोजनदृष्ट्या संदर्भयोग्य अशी भाषा आत्मसात व्हायला हवी, हे यामागील प्रमुख तत्त्व आहे. एखादा शब्द व त्यावर आधारलेली रचना किंवा काही व्याकरणिक रूपे भाषेच्या विशिष्ट बोलीमध्ये या भौगोलिक उपभेदामध्ये विशेषकरून वापरली जात असेल, तर त्याविषयीची नोंद (उदा. **गेलो होतो/गेले होते** या प्रकारच्या प्रमाण-मराठीतील रूपांऐवजी **गेलेलो / गेलेली** अशी रूपे मुंबईत बोलल्या जाणाऱ्या मराठीत वापरली जातात;[१३]

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मराठी अभ्यास परिषद

gas हा शब्द अमेरिकन इंग्लिशमध्ये petrol साठी वापरला जातो); औपचारिक व अनौपचारिक संदर्भामधील उपयोजन (भोजन-जेवण, विवाह-लग्न; इंग्लिशमध्ये respond-answer); एखादा शब्द तुच्छतादर्शक असल्यास तशी नोंद (भटं किंवा भटुर्डे; इंग्लिशमध्ये nigger); शिष्ट वापरात निषिद्ध असणारे प्रयोग (चुत्या; इंग्लिशमधील fuck); शब्दांचे वा रूपांचे कालबाह्यत्व (' ला ' आणि ' स ' या समानार्थी प्रत्ययांपैकी 'स' हा आधुनिक मराठीत कालबाह्य होऊ लागला आहे; इंग्लिशमध्ये Christendom); भावनिक तीव्रता वाढविण्यासाठी वापरण्यात येणारी रूपे वा प्रयोग (अनौपचारिक बोलण्यात येणारा ' साला ' हा शब्द : **कालचा अपघात साला विचित्र होता**; इंग्लिशमध्ये god–damn किंवा god–damned)– भाषेच्या संदर्भनिष्ठ उपयोजनाचे असे अनेक पैलू शब्दकोशामधील नोंदीमध्ये समाविष्ट व्हावे, म्हणून अभ्यासकांचे प्रयत्न चालू आहेत. भाषेचे योग्य प्रकारे आकलन होणे आणि तिचा बिनचूक उपयोग करता येणे, यांसाठी कोशाची मदत व्हायला हवी असेल, तर या तत्त्वांवर आधारून कोशसिद्धी होणे आवश्यक आहे; केवळ शब्दाच्या अर्थाची जंत्री देणारे साधन, या पलीकडे जाऊन कोशाचा विचार आता व्हायला हवा.

परभाषेचे अध्ययन–अध्यापन करताना शब्दकोशाबरोबरच इतर शैक्षणिक सामग्री सिद्ध करतानासुद्धा चुकांच्या विश्लेषणाची मदत घेतली, तर या सामग्रीचे मोल कितीतरी वाढेल. हे वेगळे सांगायला नको. ध्वनी, शब्द, वाक्य, वाक्प्रचार, संदर्भनिष्ठ उपयोजन या पातळ्यांवर होणाऱ्या चुका, त्यांचे फुटकळ वा व्यापक स्वरूप, त्या आंतरभाषीय आहेत, की विकासात्मक आहेत, याचे विश्लेषण– या सर्व गोष्टींचा साकल्याने विचार करून अध्यापकाने जर भाषा शिकविण्याची तयारी केली, तर भाषाशिक्षणाची एकूण प्रक्रिया तर समृद्ध होईलच, त्याचप्रमाणे द्वितीय भाषा शिकताना घडणाऱ्या प्रक्रियांविषयीच्या आपल्या ज्ञानातही भर पडेल.

टीपा :

१. To err is human, to forgive, divine... असे अलेक्झांडर पोप या कवीने **An Essay on Criticism** या काव्यात म्हटले आहे. पाहा : Pope, 1711 : line 525.

२. ' बालभाषा ' या विषयावरील आढाव्यासाठी पाहा : अशोक केळकर, 1982 ; 454-455.

३. ★ हे चिन्ह कुरचित किंवा अशुद्ध प्रयोग दर्शविते.

४. इंग्लिशमध्ये अभ्यासकांनी Interlanguage, Approximative System, इत्यादी संज्ञा वापरलेल्या आहेत. पाहा : Selinker, 1972; Corder, 1973 : 256-294; Corder, 1981; Nemser, 1971.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मराठी अभ्यास परिषद

५. ' स्वनिम ' या संकल्पनेच्या स्पष्टीकरणासाठी पुढील दोन पुस्तकांतील स्वनिम-विचारावरील लेख पहा : मालशे, इनामदार, सोमण (1982) आणि काळे व सोमण (1982).
६. उदाहरणार्थ, पाहा : Fries, 1945 आणि Lado, 1957.
७. अधिक चर्चेसाठी पाहा : James, 1980 : 181–192.
८. (46) व (47) हे वाक्यांश **सोबत** या साप्ताहिकातील गणेश सोवनी यांनी लिहिलेल्या ' दखल ' या सदरात आढळले (**सोबत**, 23 जून, 1985 : 9.) हे संपूर्ण सदर मराठीच्या निजभाषकाने लिहिले आहे, असे म्हणणे कठीण आहे.
९. Hornby यांच्या कोशाची चौथी आवृत्ती (1989) उपलब्ध आहे. **LDCE** या कोशाचीही दुसरी आवृत्ती (1987) उपलब्ध आहे. Michael Swan यांचा **Practical English Usage** (1980) हा कोशरूपी ग्रंथही उल्लेखनीय आहे. इंग्लिश वाक्प्रचारांच्या (idiomatic usage) अधिक तपशीलवार व नव्या प्रकारच्या अभ्यासासाठी **Longman Dictionary of English Idioms** (1979) आणि Cowie, Mackin व McCaig यांनी सिद्ध केलेला द्विखंडात्मक **Oxford Dictionary of Current Idiomatic English** (vol. 1 : 1975; vol. 2 : 1983) हे कोश पाहावे.
१०. **ALD** मध्ये ग्रथित केलेली say, tell, talk, speak, इत्यादी धातूंची तुलना पाहावी.
११. पाहा : **महाराष्ट्र शब्दकोश**, पृ. 1162.
१२. ' ठेव ' आणि ' टाक ' या धातूंवर **महाराष्ट्र शब्दकोशात** ज्या नोंदी आहेत, त्यांतील उपयोजनाविषयीचा तपशील मात्र लक्षणीय आहे. विशेषतः ' ठेवणे ' या क्रियापदावरील पुढील नोंद पाहा : ' जेव्हा हे क्रियापद दुसऱ्या क्रियापदांच्या ऊन प्रत्ययान्त धातुसाधितांशी योजतात, तेव्हा त्याचा अर्थ एखादी गोष्ट करणे, कोणत्याही क्रियापदाच्या विषयाचे ठेवणे, किंवा तीच स्थिती राखणे, अथवा त्या क्रियेने झालेली आविष्कृती असा होतो. जसे– हे पत्र लिहून ठेव; पिंटात पाणी घालून ठेव इ; ठेवणे हे क्रियापद आणि टाकणे हे क्रियापद यांमध्ये अर्थाच्या दृष्टीने साधर्म्य व विषमताही आहे. दोन्हीही क्रियापदे एखाद्या कृत्याची पूर्णता किंवा एखाद्या विषयाची पूर्णता दर्शवितात; परंतु ठेवणे हे क्रियापद क्रियेमध्ये काळजी व लक्ष्य– विशेषतः राखून ठेवण्यातील– कौशल्य दर्शविते. तर टाकणे हे क्रियापद एखादी वस्तू दूर, लांब किंवा कायमची सोडून देणे, तिचा त्याग करणे, हात धुऊन मोकळे होणे, किंवा दुर्लक्ष, हयगय इ. अर्थ दर्शविते. जसे–त्याची पोथी त्यास देऊन टाक इ. यात कसे तरी कार्य पूर्ण करण्याचा बोध होतो... (पृ. 1408.)

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मराठी अभ्यास परिषद

१३. अशोक केळकरांनी या संदर्भात पुढील उदाहरणे नोंदवली आहेत : 'प्रमाण-मराठीत ज्या गोष्टींना "मुट्टी", "गेट", "पौंडभर" म्हणतात. त्या गोष्टींना मुंबईला "रजा", "चौकी", "रत्तलभर" म्हणतील.' (केळकर 1983 : 67.)

संदर्भसूची

मराठी

काळे, कल्याण व अंजली सोमण, (संपा.) (१९८२) **वर्णनात्मक भाषाविज्ञान : स्वरूप आणि पद्धती**, नासिक : गोखले एज्युकेशन सोसायटी.

केळकर, अशोक रा. (१९८२) 'बालभाषा', **मराठी विश्वकोश**, खंड ११, मुंबई : महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, पृ. ४५४–५५.

.... (१९८३) **वैखरी : भाषा आणि भाषाव्यवहार**, मुंबई, मॅजेस्टिक.

दाते, य. रा. आणि चिं. ग. कर्वे (संपा.) (१९८८) **महाराष्ट्र शब्दकोश**, पुणे : वरदा (प्र. आ. १९३४).

मालशे, मिलिंद (१९८२) 'भाषाविज्ञान व इतर अभ्यासक्षेत्रे', काळे व सोमण (संपा.) (१९८२) : २५२–२७०.

मालशे, स. गं., हे. वि. इनामदार व अंजली सोमण (संपा.) (१९८२). **भाषाविज्ञान : वर्णनात्मक आणि ऐतिहासिक**, पुणे : संजय प्रकाशन.

English

Burt, M. and Kiparsky, C. (1972). **The Gooficon : A Repair Manual for English. Rowley, MA. :** Newbury House.

Corder, S. P. (1973) **Introducing Applied Linguistics** Hormondsworth : Penguin.

---- (1981). **Error Analysis and Interlanguage** Oxford : OUP.

Duly, H., M. Burt and S. Krashen (1982). **Language Two.** New York : OUP.

Fries, C. C. (1945). **Teaching and Learning English as a Foreign Language.** Ann Arbor : University of Michigan Press.

James, Carl (1980). **Contrastive Analysis.** Harlow : Longman.

Lado, R. (1957). **Linguistics Across Cultures.** Ann Arbor : University of Michigan Press.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मराठी अभ्यास परिषद

Nemser, W. (1971). 'Approximative Systems of Foreign Language Learners' **IRAL**, Vol. 9, No. 2, 115-123.

Pope, Alexander (1711) 'An Essay on Criticism' anthologized in **English Critical Texts** (eds. D. J. Enright and E De Chickera), London : OUP, 1962, pp. 111-130

Richards, J. (ed.) (1974). **Error Analysis.** London : Longman.

Selinker, L. (1972). 'Interlanguage'. **IRAL**, Vol 10, No. 3, 219-31.

Swan, M. (1980). **Practical English Usage.** Oxford : ELBS & OUP.

—— & B. Smith (1987) **Learner English : A Teacher's Guide to Interference and Other Problems.** Cambridge : CUP

Wilkins, D. A. (1972). **Linguistics in Language Teaching.** London : ELBS & Edward Arnold.

मानव्यविद्या आणि सामाजिक विज्ञान विभाग,
भारतीय तंत्रज्ञान संस्थान, पवई, मुंबई ४०० ०७६

शब्द, चिन्हे, अधिकारपदे घ्या; शेतजमिनीची आखणी, तण आणि धान, जोखड आणि लगाम घ्या; चंद्रग्रहणाचे वेध, दगडधोंड्यांचा शोध, तलवारींची धातुपरीक्षा घ्या --थोडक्यात, जे जे काही माणसाचे आहे, माणसावर अवलंबून आहे, माणसाच्या कामी येणारे आहे, माणसाचे मनोगत सांगणारे आहे, माणसाच्या उपस्थितीची, कर्तृत्वाची, अभिरुचीची आणि जीवनरीतीची ओळख पटवणारे आहे, त्या त्या सगळ्याची नव्या इतिहासकाराला दखल घ्यायची आहे.

ल्युसिएं फेव्हर, 'Vers une autre histoire' ('एका नव्या प्रकारच्या इतिहासाकडे' या १९४९ मधील लेखातून किंचित् स्वैर अनुवाद करून)

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

मराठी अभ्यास परिषद

भाषांतरातील काही अडचणी

रा. भि. जोशी

भाषांतरे करण्याचे आणि इतरांनी केलेली भाषांतरे तपासण्याचे काम मी थोडेबहुत केले आहे. इतर भारतीय भाषांतील लेखनाचे मराठीत भाषांतर करताना विशेष अडचण जाणवत नाही. एखादी म्हण, वाक्प्रयोग, अगदी स्थानिक किंवा समाजविशिष्ट असे शब्द असले, तर गोष्ट वेगळी. एरवी भाषांतर करताना फारशी अडचण येत नाही. इंग्रजी भाषेतील लेखनाचे मराठीत भाषांतर करताना मात्र ती अधिक प्रमाणात जाणवते. ह्याला अनेक कारणे आहेत. त्यांपैकी इतिहास, भूगोल आणि सामाजिक परिस्थिती आणि परंपरा ह्यांविषयी माहितीचा अभाव किंवा अपुरेपणा आणि इंग्रजी भाषेचे अपुरे ज्ञान. त्याबरोबरच आपल्या स्वतःच्या– म्हणजे मराठी भाषेचेही– मी अज्ञान म्हणत नाही पण अपुरे ज्ञान ही प्रमुख आहेत. एखाद्या विषयावरच्या लेखांचे; पुस्तकाचे भाषांतर करीत असताना ज्या अडचणी येतात. त्याही दुहेरी असतात. भाषेच्या अपुऱ्या ज्ञानाबरोबरच त्या विषयाचे अज्ञान हेही कारण असू शकते, तसेच त्या विषयात काही पारिभाषिक संज्ञा असतील आणि तोच अर्थ व्यक्त करणाऱ्या मराठी भाषेतील पारिभाषिक संज्ञांसंबंधीचे अज्ञान असेल, तर तेही एक कारण असू शकते.

एखादा अनुभव किंवा एखादी क्रिया आपल्या परिचयाची असली, तर तिचा निर्देश करणारा शब्द आपल्या भाषेत असतो किंवा असला पाहिजे, अशी सर्वसाधारण समजूत असते आणि ती चुकीची असते, असे नाही. परंतु इंग्रजी भाषेतले काही शब्द मात्र असे आहेत. त्यांमागचा आशय आपल्या पूर्ण परिचयाचा असला, तरी भाषांतर करताना योग्य शब्द सापडत नाहीत आणि मग आपण तयार करून शब्द वापरतो; पण आपले समाधान होत नाही.

ज्या इंग्रजी शब्दांना समर्पक असे शब्द मराठीत नाहीत, अशांची चर्चा ह्यापूर्वी आपल्या नियतकालिकात झाली आहे. असेच आणखी काही शब्द मी पुढे देत आहे.

Mood याला मराठी पर्याय म्हणून मनःस्थिती, मनोवृत्ती, भाववृत्ती, भावस्थिती हे शब्द वापरण्यात येतात. क्वचित 'तब्येत' हाही शब्द वापरण्यात येतो. 'मर्जी' असाही शब्द वापरला जातो, 'तब्येत लागत नाही', 'मर्जी अनुकूल नाही' अशी वाक्ये वाचण्यात येतात. 'भाववृत्ती' हा शब्द अधिक रूढ होत असलेला दिसतो. इंग्रजी कोशात Mood चा अर्थ state of mind or feeling (C. O. D.); a conscious state of mind or predominant emotion (Webster's New Collegiate Dictionary). हे अर्थ लक्षात घेता 'मनःस्थिती' हा शब्द अधिक योग्य वाटतो.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मराठी अभ्यास परिषद

पण खरी अडचण येते, ती आपण निसर्गाच्या प्रसन्न, शांत, उदास, रौद्र, भयानक, अशा वेगवेगळ्या Moods चा अनेक वेळा लिहिता–बोलताना उल्लेख करतो. अशा वेळी Mood साठी कोणता मराठी शब्द योजायचा ? त्या त्या निसर्ग–दृश्यामुळे आपल्या मनावर त्या त्या वेळी होणाऱ्या परिणामाचा आपण निसर्ग-दृश्यांवर आरोप करतो. अशा वेळी निसर्ग उदास होता किंवा निसर्गाची मनःस्थिती प्रसन्न होते. असा शब्दप्रयोग करणे चमत्कारिक दिसेल. दृश्य प्रसन्न, उदास, भीषण होते, असा वाक्प्रयोग करता येईल, पण तीदेखील निसर्गाची मनःस्थिती म्हणता येणार नाही. तो आपल्या मनःस्थितीचा निसर्ग-दृश्यावर आरोपच आहे.

अशीच अडचण admire, appreciate ह्या शब्दांना मराठी पर्याय निवडतानाही येते. admire चा C. O. D. मध्ये Regard with pleased surprise or approval असा अर्थ दिला आहे. त्यातील मूळ लॅटिन शब्दाचा अर्थ Wonder at असा आहे. Webster च्या कोशात admire चा अर्थ To think highly of, often in somewhat impersonal manner आणि admiration चा A feeling of delighted or astonished approbation. (म्हणजे आश्चर्य-युक्त पसंती). आपण साधारणतः admire साठी 'प्रशंसा करणे', 'कौतुक करणे', असे पर्याय वापरतो. त्यात delighted approbation येते. पण astonished ची छटा येत नाही. admire करण्याची क्रिया आपण करीत आलो आहोत आणि करतो; पण एकाच शब्दात दोन्ही भावना येतील, असा पर्याय मला आढळला नाही.

तीच गोष्ट appreciate या शब्दाची appreciate चा अर्थ यथायोग्य मूल्यमापन करणे, असा आहे, आपण बहुतेक वेळा रसग्रहण करतो, गुणग्रहण करणे, असा शब्द-प्रयोग शाळांतून कवितेचे apprecia'ion करायचे असते, तेव्हा खालील कवितेचे रस-ग्रहण करा, असे म्हटलेले असते. इतर संदर्भातही कवितेचे मूल्यमापन करताना रसग्रहण हा शब्द वापरतो. परंतु I appreciate what you say याचे मराठीत भाषांतर करायचे झाले, तर आपण 'तुम्ही म्हणता त्याचे मी रसग्रहण (किंवा गुणग्रहण) करतो' असे म्हणणार नाही. तुमचे म्हणणे मला पटते. तुमच्या म्हणण्याचे महत्त्व (किंवा मर्म) माझ्या लक्षात आले आहे ' असे म्हणू, पण appreciate साठी एकच शब्द वापरता येत नाही. ज्यात सर्व अर्थ सामावलेले असतील असा एखादा एकच शब्द आहे का ?

भाषांतरात अडचण निर्माण करणारे असेच आणखी काही शब्द आहेत, त्यांचा पुढे केव्हा, तरी विचार करू.

२ अन्नपूर्णा, साहित्य सहवास, वांद्रे (पूर्व) मुंबई ५१

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मराठी अभ्यास परिषद

' मराठी लेखनातील विरामचिन्हांचा उपयोग '

सु. रा. चुनेकर

' भाषा आणि जीवन 'च्या १९८९ च्या दिवाळी अंकात (वर्ष ७ : अंक ४) डॉ. अशोक केळकरांचा ' मराठी लेखनातील विरामचिन्हांचा उपयोग ' हा दीर्घ लेख आला आहे. भाषाशुद्धी, लिपिशुद्धी, शुद्धलेखन, वाक्यरचना, इत्यादी सर्वच विचार लेखनव्यवहारातील महत्त्वाचे घटक आहेत, आणि लेखनशैली सुस्पष्ट, सुबोध, वाचनीय, वेधक होण्यासाठी या सर्वांचा सूक्ष्म विचार व्हायला पाहिजे; त्यांचे भान असायला पाहिजे. परंतु अलीकडे लेखनसौंदर्य, शैलीसौंदर्य यांची जाणीवच लेखनव्यवहारातून नष्ट व्हायला लागली आहे, की काय, असे पुष्कळदा वाटते.

लेखनसौकर्यामध्ये व लेखनसौंदर्यामध्ये विरामचिन्हे हा एक महत्त्वाचा घटक आहे. या विरामचिन्हांचेही भान लिहिताना फारसे असल्याचे अलिकडच्या लेखनात दिसत नाही. या काहीशा दुर्लक्षित, पण लेखनसौंदर्य, लेखनसुबोधता यांच्या दृष्टीने महत्त्वाच्या घटकाकडे डॉ. केळकरांच्या या अतिशय अभ्यासपूर्ण सूक्ष्मविचारी लेखाने लक्ष वेधले आहे.

या लेखालाच काही पूरक जोड देण्यापुरते हे टिपण :

१. ' प्रमाण मराठीतील ठळक ठळक संदेहस्थळे घेऊन त्यासंबंधी मार्गदर्शन हुडकावे. ' या उद्देशाने डॉ. द. न. गोखले यांनी ' महाराष्ट्र साहित्य पत्रिके 'तून ' भाषा-शोधन (भाषिक व्यवहारातील विवेक)' ही लेखमाला लिहिली, तिचाही या संदर्भात आवर्जून उल्लेख करावासा वाटतो. [महाराष्ट्र साहित्य पत्रिका ', लेखांक : (१) एप्रिल-जून १९८७, (२) जुलै-सप्टेंबर १९८७, (३) जानेवारी-मार्च १९८८, (४) एप्रिल-जून १९८८, (५) जुलै-सप्टेंबर १९८८, (६) एप्रिल-जून १९८९] ही लेखमाला सहाव्या लेखांकापाशी पुरी झाली किंवा नाही, याचा निर्देश नाही; पण ती यानंतरच्या अंकांतून आलेली नाही; तेव्हा स्थगित झाली असावी, असे वाटते.

२. विरामचिन्हांचा विचार तसा पूर्वीपासून, अधूनमधून होत आला आहे. ब्रिटिश राजवटीच्या आरंभकाळात जेव्हा मराठी लेखनरीती नवे रूप घेऊ लागली होती ,तेव्हा आरंभी या अशा अनेक गोष्टींचा विचार करावा लागलेला होता. ' विरामचिन्हांची परिभाषा (Marathi Punctuation) ' या नावाची मे. थॉमस कँडी (इ. स. १८०४ –१८७७) यांची एक सोळा पृष्ठांची पुस्तिका इ. स. १८५० मध्ये प्रकाशित झाली होती.[१]

१ या पुस्तिकेचे पुनर्मुद्रण अ. का. प्रियोळकरांनी ' मराठी संशोधन पत्रिके 'मधून (व. ४ अं. ४, जुलै १९५७, पृ. १-८) केले होते.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मराठी अभ्यास परिषद

मे. कँडींनी या पुस्तिकेच्या प्रस्तावनेत तिच्या लेखनामागील हेतू स्पष्ट केला होता :

'मराठी भाषेतील ग्रंथांत विरामचिन्हें घालण्याची चाल मागें नव्हती. परंतु युरोपखंडांतील इंग्लिश वगैरे भाषांमध्यें या चिन्हांपासून बहुत उपयोग होतो, हें पाहून मराठी भाषेंतही हीं चिन्हें घालण्याची चाल पडावी अशी इच्छा अलीकडे बहुतांस झाली आहे. म्हणून इंग्लिश भाषेंतील जीं चिन्हें मराठी भाषेंत घालण्याजोगीं आहेत, ती घेऊन त्यांचें ज्ञान सर्व लोकांस व्हावें या हेतूनें ही परिभाषा केली आहे.'

विषयारंभीच्या प्रस्तावनेत मे. कँडीनी 'विरामचिन्हे म्हणजे वाक्याचा विभाग करून लेखातला अर्थ स्पष्ट समजण्याकरिता ज्या खुणा घालतात, त्या.' अशी विरामचिन्हांची व्याख्या केली आहे. स्वल्पविरामचिन्ह (,), अर्धविरामचिन्ह (;), पूर्णविरामचिन्ह (.), प्रश्नचिन्ह (?), आणि उद्गारचिन्ह (!) अशी पाच विरामचिन्हे मानून मे. कँडींनी त्यांचा विचार केला आहे.

३. मराठी कवितेच्या मुद्रणामध्ये विरामचिन्हांचा वापर प्रथम माधव चंद्रोबा (डुकले) यांनी चालविलेल्या 'सर्वसंग्रह' या मासिकात (१८६०-१८६६-६७) करण्यास सुरुवात झाली. त्यापूर्वी चरणरेघ (।), दुहेरी रेघ (॥) एवढीच चिन्हे होती. 'कित्येक कवितेत विरामचिन्हे घालण्याचा प्रयत्न केला आहे, परंतु हा पहिलाच प्रयत्न आहे,' असे संपादकांनी म्हटले आहे. [संदर्भ : 'मराठी गद्याचा इंग्रजी अवतार', दत्तो वामन पोतदार, आ. १, १९२२, पृ. १०१].

४. माधव जूलियन यांनी एका वेगळ्या विरामचिन्हाचा उपयोग 'गज्जलाञ्जली'तील काही कवितांमध्ये केला आहे. या त्यांनी स्वतःच बनविलेल्या विरामचिन्हाकडे त्यांनी स्वतःही आवजून लेखक-वाचकांचे लक्ष वेधल्याचे, त्यासंबंधाने कुठे काही लिहिल्याचे दिसत नाही; आणि त्याच्या संबंधाने त्यांचे काही धोरण निश्चित झाले असावे, असेही वाटत नाही. काही ठिकाणी हे विरामचिन्ह ते वापरतात; काही, तत्सदृशच, ठिकाणी ते ते वापरताना दिसत नाहीत. प्रश्नचिन्ह व उद्गारचिन्ह यांच्या एकत्रीकरणातून हे संयुक्त विरामचिन्ह (?!) त्यांनी तयार केले आहे. 'गज्जलाञ्जली'त चार ठिकाणी हे विरामचिन्ह वापरलेले दिसते. दर्शनी प्रश्न, पण भावदृष्ट्या उद्गार असा अभिप्राय व्यक्त करण्यासाठी, स्वतंत्र विचारशील आणि कृतियुक्त प्रयोगशील माधवराव पटवर्धनांनी हे नवेच प्रश्नांकित उद्गारवाची विरामचिन्ह बनवून त्याचा वापर केला असावा.

(१) 'असेना हीन मी प्राणी ?! न पर्वा, तू महाराणी !'

['बुझावणी', गज्जलाञ्जलि, क्र. १२]

(२) 'असेना कांति सोन्याची ?! टळेना धूळ होण्याची.'

['कोठे ?', ग. १३]

(३) 'आपुल्या संरक्षणाची काळजी अन्यावरी ?!'

['क्षात्रधर्म', ग० ३७]

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मराठी अभ्यास परिषद

(४) ‘ जात्रो पुढेच तारू, बैसोत हेलकावे ?!’

[‘ अज्ञात नाथास ’, ग० ८८]

उद्‌गारान्तर्हित प्रश्नोच्चार जेथे असेल, तेथे सर्वत्रच पटवर्धन ‘ ?! ’ या नवनिर्मित जोडचिन्हाचा वापर करतातच असे, नाही, वस्तुतः

‘ कुठे कोपींत मी माझ्या तृणाच्या,
कुठे तू त्या तुझ्या अैने–महाली ? ’

[‘ हेमंत ’, ग. १८]

या चरणातही उद्‌गारगर्भ प्रश्न अभिप्रेत आहे. पण माधव जूलियन येथे ‘ ?! ’ या चिन्हाचा उपयोग करीत नाहीत.

‘ किती मैल अंतर राहिलें अपुल्यांत मोहन–मञ्जरी !
किति मास अंतर जाहलें अपुल्यांत मानस-सुंदरी ! ’

[‘ मानस–सुन्दरी ’, ग० २६]

येथे माधव जूलियन उद्‌गारचिन्ह वापरतात; तर ‘ किती दूर मी ? ’

[‘ सानुली ’, ग० २७]

येथे त्यांनी प्रश्नचिन्ह वापरले आहे.

‘ प्रश्नोत्तर ’ या गज्जलातील (ग० ४१) तीन ओळींमधील विरामचिन्हांचा वापर तपासून बघण्यासारखा आहे.

‘ ती म्हणाली, “ साङ्ग रे होती कशी ती देखणी. ” ’

[चरण क्र. १]

‘ ती म्हणाली, “ सावळा का वर्ण तो होता तिचा ? ” ’

[चरण क्र. ३]

‘ ती म्हणाली, “ ही अहन्ता एक जातीची दिसे ! ” ’

[चरण क्र. १७]

तीनही ओळी साधारणतः एकाच तोलाच्या आहेत; तीनही ओळींचा भाव प्रश्नार्थक आहे; पण प्रत्येक ओळीमध्ये वेगवेगळ्या विरामचिन्हांचा वापर केला आहे. पहिल्या ओळीत ‘ साङ्ग रे ’ या शब्दसंहतीमुळे येथे स्पष्ट विधान आहे. पण ‘ होती कशी ती देखणी’ हा पुढचा वाक्यांश प्रश्नार्थक आहे. पूर्वार्धातील विधानात्मकता लक्षात घेऊन पटवर्धन येथे चरणांती पूर्णविराम देतात. दुसऱ्या ओळीअखेर पटवर्धनांनी सरळ प्रश्नचिन्ह उपयोजिले आहे. तिसऱ्या ओळीत संभ्रमसूचक प्रश्न (किंवा शंकानिरसनात्मक सुटकेचा

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मराठी अभ्यास परिषद

सुखद भावोद्‌गार) गर्भित आहे. तेथे पटवर्धन उद्‌गारचिन्ह वापरतात.

अशा प्रकारे, काहीशा समान तोलाच्या चरणरचनेत वेगवेगळ्या विरामचिन्हांचा वापर केलेला दिसतो; आणि यातील अभिप्राय सूक्ष्मतरल असल्याने निश्चित एकच धोरणाचा आग्रहही काहीसा अनाठायी ठरावा!

५. हा विरामचिन्हांचा विचार आणखीही अनेक प्रकारे करता येईल. अभिप्रेत आशय जास्तीत जास्त नेमकेपणाने व्यक्त करण्याच्या लेखनरीतीचे विरामचिन्ह हे एक साधन आहे; अक्षर - शब्द यांच्याइतकाच विरामचिन्ह हा लेखनरीतीचा अभिन्न, एकजीव घटक आहे आणि विरामचिन्हांच्या अभिप्रायसूचकतेचा जास्तीत जास्त वापर करून घ्यावयला पाहिजे हे लक्षात आले, की विरामचिन्हांचा गांभीर्याने विचार होत राहातो.

माझ्यापुरता मी दुहेरी ("—") व एकेरी (' — ') अवतरणचिन्हांचा वापर अशा फरकाने करतो : ग्रंथनाम दुहेरी अवतरणात; नियतकालिकाचे नाव, लेखाचे शीर्षक किंवा एखाद्या शब्दाकडे, शब्दसंहतीकडे विशेष लक्ष वेधावयाचे असल्यास एकेरी अवतरण.

पूरक माहिती, स्पष्टीकरणात्मक विवेचन असेल, तर गोल कंस '( )' संपादकीय सूचक मजकूर असल्यास चौकोनी कंस '[ ]'.

विरामचिन्हांचा फारसा उपयोगच अलिकडच्या लेखनात होत असलेला दिसत नाही. विचार-विकार प्रकटनामध्ये अक्षरघटित शब्दांप्रमाणे विरामचिन्हांचाही कार्यभाग महत्त्वाचा आहे, आणि त्यायोगे शैलीतही वैचित्र्य, वेधकता येते; पण याचेच भान आज-काल आपण गमावून बसलो नाही ना? (विठ्ठलराव घाट्यांच्या लेखनात अर्धविरामाचा आवर्जून, अर्थपूर्ण अधिक वापर केलेला असतो, याची आठवण होते.) शुद्धलेखन वाक्य-रचना यांच्याबरोबरच विरामचिन्हांचाही तपशिलाने, बारकाव्याने विचार व्हावयाला हवा, असे पुष्कळ दिवस वाटत होते. विरामचिन्हांचा काटेकोर सुनिर्धारित असा आपण विचारच फारसा करीत नाही. जेव्हा जसे सोयीला येईल, तसा त्यांचा वापर आपण करीत राहतो. (यात मुद्रणकर्त्यांचाही वाटा असतो!) विरामचिन्हांच्या वापरासंबंधात आपण जागरूक असावयाला हवे; त्याच्या अर्थबोधकतेचा लाभ घ्यावयाला हवा. शैलीसौंदर्य शैली-सौकर्य यांतील विरामचिन्हांच्या महत्त्वाकडे लक्ष वेधण्याचे कार्य डॉ. अशोक केळकरांच्या लेखाने केले आहे.

अवशिष्ट :

'मराठी लेखनातील विरामचिन्हांचा उपयोग', भाषा आणि जीवन ७ : ४, पृ. ६

'§ काकपदचिन्ह' ऐवजी '§ सेक्शन मार्क', '∧ काकपदचिन्ह'

पृ. ३२ : 'आम्ही कोण्णींच्या मिंध्या नाही!'

स्मरण : 'आम्ही काही कोऽऽऽऽऽणाच्या मिंध्या नाही आहोत.' 'अखेर लग्न जमले', चिं. वि. जोशी, 'चिमणरावाचे चऱ्हाट' (आ. ७, १९७३), पृ. १२८.

मराठी विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे ४११ ००७

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मराठी अभ्यास परिषद

विरामचिन्हांचे अध्यापन
(टिपणे)

–द. न. गोखले

विरामचिन्हांवर एक प्रदीर्घ आणि उद्बोधक लेख डॉ. अशोक केळकरांनी 'भाषा आणि जीवन'च्या १९८९ च्या दिवाळी अंकात लिहिला आहे. त्या लेखाच्या निमित्ताने विरामचिन्हांच्या शालेय अध्यापनाविषयी काही विचार येथे मांडत आहे.

(१) डॉ. केळकरांनी एकेक प्रसंग घेऊन त्या त्या प्रसंगी कोणकोणती विरामचिन्हे वापरली जातात, ते सूक्ष्मपणे नि विस्ताराने सांगितले आहे. ही त्यांची पद्धती अभिनव तर आहेच; पण तीमुळे विरामचिन्हांच्या उपयोगावर सतत काही ना काही वेगळा प्रकाश पडत राहतो, यात शंका नाही. पण हीच पद्धती शालेय अध्यापनात वापरणे योग्य होणार नाही.

प्रसंगांपेक्षा चिन्हे स्थूल नि मूर्त असतात; नि म्हणून समजायला सोपी जातात. डॉ. केळकरांनी मुख्य असे जे ८ प्रसंग निवडले आहेत आणि त्या मुख्य ८ प्रसंगांचे जे २०–२२ उपप्रसंग पाडले आहेत आणि त्या २०–२२ उपप्रसंगांचे पुन्हा जे ५-५० उप–उप–प्रसंग दाखविले आहेत, त्यांची तुलना जर पूर्णविराम, उद्गारचिन्ह, प्रश्नचिन्ह वगैरे विरामचिन्हांशी केली, तर हे सहज लक्षात येईल. विरामचिन्हे सापेक्षतः आकलन-सुलभ असल्यामुळे अध्यापनात विरामचिन्हांकडून प्रसंगांकडे जाणे योग्य होईल.

(२) आधी परिचय आणि मग अध्ययन हाच क्रम विरामचिन्हांच्या अध्यापनात ठेवला पाहिजे. यासाठी पहिल्या ४ प्राथमिक इयत्तांत विरामचिन्हे मुद्दाम शिकवू नयेत. पाठ्यपुस्तकात किंवा अन्यत्र पाहून पाहून त्यांचा ढोबळ परिचय मुलांना होऊ द्यावा. मग इयत्ता ५ वी पासून त्यांच्या अध्यापनाचा प्रयत्न व्हावा.

(३) विरामचिन्हेही क्रमशः, गटवार शिकविली पाहिजेत. शुद्धलेखन नि ही विराम-चिन्हे इयत्तावार विभागून क्रमशः शिकविण्याचे प्रयत्न आतापर्यंत थोडेसे झाले आहेत. पण त्यांना सार्वत्रिक स्वरूप येऊन ते अधिक व्यापक नि सूक्ष्म प्रमाणावर होणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने विरामचिन्हांचे प्रारंभिक पुढील गट पडतील.

(अ) पूर्णविराम, प्रश्नचिन्ह, उद्गारचिन्ह.

(आ) स्वल्पविराम, अर्धविराम, अवतरणचिन्ह.

(इ) संयोगचिन्ह, अपसारणचिन्ह, लोपचिन्ह.

या गटांतील चिन्हेही त्या त्या इयत्तेत पूर्णांशाने शिकवू नयेत. इयत्ता ५, ६, ७ या उच्च प्राथमिक इयत्तांत, वर दिलेल्या तीनही गटांतील चिन्हे शिकवावयाची आहेत, असे म्हटले, तर त्यांचे निश्चित नि ठळक उपयोगच तेव्हा शिकवावेत. बाकीचे उपयोग ८, ९,

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मराठी अभ्यास परिषद

अनुक्रमणिका

१० या माध्यमिक इयत्तांवर सोपवावेत. उदाहरणार्थ पुढील वाक्ये पाहा :

" अघू रे. अबब ! केवढी ही झोळी ! भीक मागायला तुम्हांला एवढ्या झोळ्या कशाला लागतात ? माझा सारा वाडा या झोळीत घालून नेलास, तरी कुणाला पत्ता लागायचा नाही ! "

ही वाक्ये वेगळी विरामचिन्ह- योजना करून लिहिली जाऊ शकतील. उदाहरणार्थ, ' केवढी ही झोळी ' या वाक्यापुढे कोणी प्रश्नचिन्ह घालील;... ' झोळ्या कशाला लागतात ' या वाक्यामुळे कोणी उद्गारचिन्ह वापरील आणि '.. पत्ता लागायचा नाही ' या वाक्यापुढे कोणी पूर्णविराम देईल. विरामचिन्हांच्या उपयोजनात त्या त्या प्रसंगांचे हे जे व्यक्तिनिष्ठ (subjective) मूल्यमापन डोकावते, ते ५ ते ७ या इयत्तांत मुद्दाम शिकवू नये. ते वरच्या इयत्तांवर टाकावे.

(४) विरामचिन्हांचा अर्थ मुलांच्या हळूहळू पण पूर्णांशाने लक्षात आला पाहिजे. विरामचिन्हांचा आता ' विरामदर्शक चिन्हे ' एवढाच अर्थ राहिलेला नाही. पूर्णविराम, प्रश्नचिन्ह, उद्गारचिन्ह, स्वल्पविराम वगैरे चिन्हांना ' विरामदर्शक चिन्हे ' म्हणता येईल; पण अवतरण, संयोगचिन्हे, लोपचिन्ह वगैरे चिन्हांना ' विरामदर्शक चिन्हे ' म्हणणे कठीण आहे. विकल्पचिन्ह, काकपद, अधोरेखा निरनिराळे कंस वगैरेंनाही. ' विरामदर्शक चिन्हे ' म्हणता येणार नाही. ' विरामचिन्हे ' हा शब्द आता आपण लक्षणेनेही वापरतो आणि विरामचिन्हांत, लिपीत नसलेल्या पण लेखनात सर्वसामान्यपणे वापरल्या जात असलेल्या सर्व चिन्हांचा समावेश करतो. (×, ÷, √, >, ∠ वगैरे चिन्हे सर्वसामान्य लेखनात येत नाहीत आणि त्यांना विरामचिन्हांत कोणी धरीत नाही.)

विरामचिन्हांची क्रमशः पण नीट ओळख व्हावी म्हणून, ' बोलताना आपण जागजागी निरनिराळ्या प्रकारे थांबून आपले मनोगत व्यक्त करतो; पण लिहिताना हे थांबणे कसे लिहिणार ? त्यासाठी काही चिन्हे वापरतात ' अशी विरामचिन्हांची प्रारंभिक ओळख करून देता येईल. ' काही हावभाव चिन्हांनी व्यक्त होऊ शकतात ' हे उद्गारवाचक किंवा प्रश्नवाचक चिन्हांतून दर्शवून विरामचिन्हांची पुढची ओळख करून देता येईल. विरामाच्या जागा नि हावभाव हे ज्याप्रमाणे विरामचिन्हांनी दर्शविता येतात, त्याप्रमाणे मनातील काही इतर अर्थही (जो लिपीने व्यक्त करता येत नाही, तो.) विरामचिन्हांनी दाखविता येतो, हे सांगून विरामचिन्हांची पुढची ओळख करून देता येईल. या वेळी, काकपद, अधोरेखी वगैरे चिन्हे उपयोगी पडतील.

(५) वरील क्र. ३ मध्ये अ, आ, इ असे विरामचिन्हांचे तीन गट दिले असून त्या गटांत नऊ विरामचिन्हांचा समावेश केला आहे. विरामचिन्हे क्रमशः शिकवताना, उरलेली बहुतेक विरामचिन्हे वरच्या इयत्तांत, म्हणजे ८ वी, ९ वी, १० वीमध्ये, शिकवावीत. मात्र; याचा अर्थ, झाडून सर्व विरामचिन्हे शिकविण्यात समाविष्ट केली पाहिजेत, असा नाही. वरच्या इयत्तांत अपूर्णविराम (:), खंडविराम (...), यथोपरिचिन्ह (″),

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मराठी अभ्यास परिषद

काकपद, संक्षेपचिन्ह (०) वगैरे चिन्हांची ओळख करून द्यावी; पण डॉ. केळकरांनी दिलेल्या २५–३० चिन्हांपैकी बाकीची दहा-पंधरा चिन्हे न शिकवता केवळ निरीक्षणावरून, चुकतमाकत, प्रश्न विचारीत, मुलांना शिकू द्यावीत. सर्वच चिन्हे मुले वापरात बघत राहतील, ठेचा खात वापरीत राहतील आणि योग्य इयत्तेत शिकत राहतील. असे केल्याने लिखित भाषेचा दृढ परिचयही त्यांना होईल आणि त्यांच्या मनःशक्तीही कार्यप्रवण नि सचेत राहतील.

(६) शेवटी, विरामचिन्हांचे उपयोजन हे एक शास्त्र असून, शिवाय कलाही आहे, हे शिक्षकांनी स्वतः लक्षात घेतले पाहिजे आणि विद्यार्थ्यांच्या लक्षात आणून दिले पाहिजे. ‘ शास्त्र ’, ‘ कला ’ या मोठ्या शब्दांच्या अर्थकक्षा मुलांना समजावून दिल्या नाहीत, समजल्या नाहीत, तरी एकाच प्रसंगी निरनिराळी चिन्हे वापरली जाऊ शकतात, हे त्यांना कळले पाहिजे. एकाच जागी अपूर्णविराम किंवा स्वल्पविराम येऊ शकतो, एकाच जागी अधोरेखा किंवा गोल कंस किंवा स्वल्पविराम येऊ शकतो, हे अनेक उदाहरणांवरून समजून घेतले पाहिजे, आणि वरच्या इयत्तांत शिक्षकांनी मुलांच्या लक्षात आणून दिले पाहिजे. ठाम विरामचिन्हे आणि त्यांच्या ठाम जागा प्रथम मुलांना शिकवून मग विरामचिन्हांचे प्रवाही (fluid), बदलते, सूक्ष्म उपयोग त्यांच्या आकलनकक्षेत नेऊन पोचवणे हे शिक्षकांचे काम आहे.

त्यासाठी विरामचिन्हांचा आणखी अभ्यास होऊन, अभ्यासावर आधारित असा शिक्षणक्रम आखला गेला पाहिजे. सध्या या सर्वच गोष्टी कामचलाऊ, गोलमाल पद्धतीने सुरू आहेत.

डॉ. अशोक केळकरांच्या लेखाने विरामचिन्हांच्या व्यवस्थित अभ्यासाची मराठीतील पायाभरणी केली आहे आणि विरामचिन्हांचे क्षेत्र अध्यापकांना कसे साद घालीत आहे, ते नकळत दर्शवून दिले आहे. सरकारी विद्वानांनी कृतिसत्रात अभ्यासक्रम बनवून, नि नुसत्या अनुभवाच्या बळावर लेखकांनी पाठ्यपुस्तके लिहून, ती बळजबरीने मुलांच्या गळी उतरविल्याने विरामचिन्हांचे उत्कृष्ट अध्यापन होऊ शकणार नाही. त्यासाठी साक्षेपी नि चिकित्सक संशोधनाचीही आवश्यकता आहे.

रमामंगल, २९ सहवास सहनिवास, कर्वेनगर, पुणे ४११०२९.

काटेकोरपणे लिहिलेला परिपूर्ण लेख

विजया देव

कोणतेही लेखन करताना (अगदी वाणसामानाची यादी करतानासुद्धा) नुसती आपल्या लिपीतील वर्णचिन्हे पुरेशी नसतात. त्याच्याखेरीज विविध विरामचिन्हे, संदर्भ-

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मराठी अभ्यास परिषद

चिन्हे, भेदकचिन्हे वापरावी लागतात. ती आपण कधी रूढीप्रमाणे, कधी आपल्या आकलनाप्रमाणे वापरतोही. पण त्यांना त्यांची विशिष्ट कार्ये आहेत, त्यांच्या वापरामागे निश्चित अशी तत्त्वे आहेत याची पुरेशी जाण आपल्या लेखनातून दिसत नाही. या वर्ण-चिन्हेतर चिन्हांची सांगोपांग चर्चाही मराठीच्या संदर्भात झालेली नव्हती.

ही उणीव भरून काढून विरामचिन्हांचा चिकित्सक आढावा घेण्याचे मोठेच कार्य या लेखाने केले आहे. लेखाची मांडणी अभिनव व उपयुक्ततेला प्राधान्य देणारी आहे. ' एक एक विरामचिन्ह क्रमाने घेऊन, ते कोणत्या प्रसंगी कोणते कार्य पार पाडते, हे पाहत बसण्यापेक्षा एकएक प्रसंग क्रमाने घेऊन, त्या ठिकाणी कोणती विरामचिन्हे पर्याय म्हणून वापरायला उपलब्ध असतात; आणि ती त्या ठिकाणी कोणती कार्ये पार पाडतात... ' हे पाहणे या दिशेने विवेचनाची मांडणी केली गेली आहे. त्यापूर्वी सर्व चिन्हांची गटवार यादी, आवश्यक तेथे त्यांचे संज्ञांकन आणि चिन्हांकनाची तत्त्वे हे टप्पे आहेत.

वाक्याच्या शेवटी आणि वाक्यांतर्गत विविध ठिकाणी आपण पूर्णविराम, अर्धविराम, प्रश्नचिन्ह, कंस, पायमोड अशी विविध प्रकारची व विविध आकारांची अठ्ठावीस तरी चिन्हे वापरतो. तांत्रिक खुणा वेगळ्याच. शिवाय परिच्छेद तोडणे, समास सोडणे, शब्द जोडून अथवा तोडून लिहिणे हा मांडणीचा भाग असतो, तो वेगळाच. हे प्रकार फक्त लेखनाच्या शिस्तीसाठी,नियमनासाठीच असतात, असे नाही, तर त्यांचा संबंध थेट भाषेच्या व्याकरणिक व्यवस्थेशी व अर्थांगाशी असतो. त्यामुळे चिन्हांकनाकडे दुर्लक्ष करणे आपल्याला परवडणारे नाही. म्हणून हा लेख लेखन–वाचन, मुद्रण, शिक्षण, संपादन, मुद्रितशोधन अशा विविध क्षेत्रांतील मंडळींना महत्त्वाचा वाटेल. अगदी कवींनासुद्धा. कारण पद्यात छंदोबद्ध ओळ, कडवे, श्लोक, पंक्ती यांच्या शेवटी दंड केव्हा वापरावा अथवा गाळावा, मांडणी कशी करावी, याची सूत्रे लेखकाने दिली आहेत. आपल्या भाषा-व्यवहारातील मुख्य घटक म्हणजे वाक्य. मग ते विधान असेल, उद्गार असेल वा प्रश्न. वेगवेगळे पदखंड, शब्द हे वाक्याच्या पोटात येणारे घटक. तेव्हा सूत्रांचा क्रम वाक्याच्या शेवटी येऊ शकणाऱ्या विरामचिन्हांनी सुरू होतो. व वाक्यांतर्गत विविध घटकांकडे वळतो. विविध घटकांची मालिका, संज्ञापनाच्या ओघात येणारे अडथळे, तुटकपणा, टिप्पणी, पालुपद, एखाद्या घटकावर हेतुतः जोर देणे अशा अनेकविध प्रसंगी वेगवेगळी पर्यायी विरामचिन्हे असतात. त्यांच्या निवडीमागची तत्त्वे विविध सूत्रांमध्ये सांगितली आहेत.

एकंदरीत विरामचिन्हांचाही शैलीदार व बारकाव्यांसहित उपयोग करता येतो, हे डॉ. केळकरांनी या लेखात दाखवून दिले आहे. डॉ. केळकरांच्या सर्वच वैचारिक व संकल्पना-त्मक लेखनात दिसणारा काटेकोरपणा याही लेखात आहे. लेखाची चौकट सुरुवातीला मांडण्यापासून निर्देशसूचीपर्यंत सर्व बाबतींत परिपूर्णता आहे.

हा लेख पुढे-मागे एखाद्या ग्रंथात समाविष्ट होईलही; पण नियतकालिकातील लेखनाला ताजेपणा असतो. तसेच ते सुटसुटीतपणामुळे चटकन वाचकांपर्यंत पोचूही शकते.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मराठी अभ्यास परिषद

बोलणं, लेखन, हस्ताक्षर, अर्थवाहित्व या सर्वच बाबतीत आज सैलढिलेपणा व काहीशी बेफिकिरी येत असताना अशा प्रकारचे लेख त्याला कुठेतरी आळा घालू शकतील, असा विश्वास वाटतो.

६१/१४ एरंडवन, पुणे ४११ ००४

कुंभकर्णाच्या अवस्थेतील मराठी लोक

पुणे स्टेशनवर गेले तर एक गोष्ट सहज नजरेत भरते. ती म्हणजे जेथे आरक्षणे वगैरे होतात तिथे सर्व सूचना इंग्रजीत किंवा हिंदीत लिहिलेल्या आहेत. एकही सूचना मराठीत लिहिलेली दिसत नाही. महाराष्ट्रातील बहुंशी सगळ्याच स्थानकांवर हा प्रकार दृष्टीस पडतो. मराठीविषयी राज्यकर्त्यांना प्रेम नाही. मराठी भाषकांनाही ते पुरेसे दिसत नाही. त्यामुळे मराठी प्रदेशात मराठीला स्थान असायला हवे, याकडे दुर्लक्ष होते; पण त्याही-पेक्षा महत्त्वाची बाब म्हणजे, एकदा भाषांना राष्ट्रभाषा म्हणून मान्यता मिळाली की, तशी मान्यता न मिळालेल्या भाषांचा उपमर्द करण्याची प्रवृत्ती बळावते. इंग्रजी आणि हिंदी या दोन्ही भाषा एकमेकांविरुद्ध खोट्या, इतरांना गोंधळात टाकणाऱ्या लढाया करीत 'राष्ट्रभाषा' असे गोंडस नाव नसलेल्या भारतीय भाषांना दुय्यम स्थान देण्याचा उद्योग संयुक्तपणे करीत आहेत. बंगाल किंवा तामिळनाडूमध्ये या खेळी खेळता येत नाहीत. कारण ती मंडळी जागरूक आहेत. मराठी भाषा व मराठी लोक कुंभकर्णाच्या अवस्थेत आहेत. तोवर हेच चालायचे.

[रविवार सकाळच्या १ जुलै १९९० च्या अंकातील प्रा. गो. पु. देशपांडे यांच्या 'श्री लंकेतील गृहयुद्धाचा उगम' या लेखातून उद्धृत]

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मराठी अभ्यास परिषद

अनुक्रमणिका

विरामचिन्हांची परिभाषा

मेजर क्यांडी

[‘ भाषा आणि जीवन ’च्या ७:४ दिवाळी १९८९ या अंकातील डॉ. अशोक केळकरांच्या लेखावरील काही प्रतिक्रिया या अंकात दिल्या आहेत. त्यांमध्ये डॉ. सु. रा. चुनेकरांच्या लेखात ज्या मेजर क्यांडी यांच्या ‘ विरामचिन्हांची परिभाषा ’ या पुस्तिकेचा उल्लेख आहे, तीच येथे वाचकांच्या कुतूहलाच्या पूर्ततेसाठी पुनर्मुद्रित करत आहोत. विरामचिन्हांच्या संदर्भातील मराठीतील हा आद्य लेख आहे. —संपादक]

प्रस्तावना

विरामचिन्हें म्हणजे वाक्याचा विभाग करून लेखांतला अर्थ स्पष्ट समजण्याकरितां ज्या खुणा घालतात, त्या.

मराठी भाषेतील ग्रंथांत विरामचिन्हें घालण्याची चाल मागें नव्हती; परंतु, युरोपखंडांतील इंग्लिश वगैरे भाषांमध्यें ह्या चिन्हांपासून बहुत उपयोग होतो, हें पाहून मराठी भाषेंतही हीं चिन्हें घालण्याची चाल पडावी, अशी इच्छा अलीकडे बहुतांस झाली आहे; म्हणून इंग्लिश भाषेंतील जीं चिन्हें मराठी भाषेंत घ्यावयाजोगीं आहेत, तीं घेऊन, त्यांचें ज्ञान सर्व लोकांस व्हावें, ह्या हेतूनें ही परिभाषा केली आहे.

मराठी भाषेंत विरामचिन्हें पाच घेतली आहेत; तीं येणें प्रमाणें. स्वल्पविरामचिन्ह (,), अर्धविरामचिन्ह (;), पूर्णविरामचिन्ह (.), प्रश्नचिन्ह (?), आणि उद्गारचिन्ह (!).

स्वल्पविरामचिन्ह घालण्याचे नियम

१ जें वाक्य सरळ आहे त्याच्या पोटीं विभाग नसतात; म्हणून त्यांत विरामचिन्हें घालण्याची गरज नाहीं.

उदाहरणें. तरणा माणूस आला होता. मला पांच भाऊ आहेंत. तिला मुलगा झाला आहे. तुझें नांव काय ? ईश्वर किती थोर आहे !

ही वाक्यें सरळ आहेत. ह्यांच्या पोटीं विभाग नाहींत; म्हणून ह्यांमध्यें विरामचिन्हें घालण्याची गरज नाहीं. ह्या उदाहरणांपैकीं पहिल्या तीन वाक्यांच्या शेवटीं पूर्णविरामचिन्ह मात्र पाहिजे; चवथ्याच्या शेवटीं प्रश्नचिन्ह पाहिजे; आणि पाचव्याच्या शेवटीं उद्गारचिन्ह पाहिजे.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मराठी अभ्यास परिषद
अनुक्रमणिका

२. सरळ वाक्यांत मध्यें जर दुसरें वाक्य किंवा वाक्यांग आलें, तर त्या वाक्याच्या किंवा वाक्यांगाच्या आरंभीं व शेवटीं स्वल्पविरामचिन्ह पाहिजे.

उदाहरण. एक तरुण कोंबडा, दोन तीन तरुण कोंबड्या संगतीं घेऊन, उकिरडा उकरीत होता.

येथें, एक तरुण कोंबडा उकिरडा उकरीत होता, हें वाक्य सरळ आहे; ह्यामध्यें ह्याच्या संबंधाचें, दोन-तीन कोंबड्या संगतीं घेऊन, हें दुसरें वाक्य आलें आहे; म्हणून ह्या वाक्याच्या मागें आणि पुढें स्वल्पविरामचिन्ह पाहिजे.

दुसरें उदाहरण. एक कुतरा, तोंडीं भाकरीचा तुकडा धरून, नदीपलीकडे जात होता.

येथें, कुतरा नदीपलीकडे जात होता, हें वाक्य सरळ आहे; ह्याच्या मध्यें, ह्याच्या अनुषंगाचें, तोंडीं भाकरीचा तुकडा धरून, हें दुसरें वाक्य आलें आहे.

३. जीं दोन-तीन सरळ वाक्यें मिळून एक मोठें वाक्य होतें, त्या त्या सरळ वाक्यांच्या मध्यें स्वल्पविरामचिन्ह पाहिजे.

उदाहरण. एक कुतरी व्यायाला झाली होती, तिनें दुसऱ्या कुतरीची प्रार्थना केली कीं, मला राहायास घर दे.

येथें, तीन वाक्यें मिळून एक मोठें वाक्य झालें आहे; म्हणून त्यांच्या त्यांच्या मध्यें स्वल्पविरामचिन्ह पाहिजे.

दुसरें उदाहरण. इतक्यांत, कोल्ही जवळ होती ती धांवत आली, आणि मोठ्या करुण स्वराने, डोळ्यांत आसवें आणून, ती गरुड पक्षिणीची काकळूत करूं लागली.

४. एकाच प्रकारचे दोहोंपेक्षां अधिक शब्द आले असतां त्या प्रत्येक शब्दापुढें स्वल्पविरामचिन्ह पाहिजे

उदाहरण. रामा, कृष्णा, केशव आणि हरि आले आहेत. आमचें घर उंच, रुंद आणि हवाशीर आहे. तो स्पष्ट, सावकाश, आणि मोठ्याने वाचतो. तो खातो, पितो, आणि निजतो.

५. परंतु कोणत्याही एका प्रकारच्या दोन शब्दांच्यामध्यें उभयान्वयी अव्यय आलें असतां, त्या शब्दांच्या मध्यें स्वल्पविरामचिन्ह नको.

उदाहरण. रामा आणि कृष्णा आले आहेत.

येथें, रामा आणि कृष्णा ही दोन नामें आहेत; ह्यांच्यामध्यें आणि हे उभयान्वयी अव्यय आलें आहे; ह्याकरितां ह्या दोन नामांच्या मध्यें स्वल्पविरामचिन्ह नको.

दुसरी उदाहरणें. माझें घर लांब आणि रुंद आहे. तो स्पष्ट आणि सावकाश वाचतो. तो जेवतो आणि निजतो.

६. वाक्याच्या आरंभीं संबोधन असतां, त्याच्या पुढे स्वल्पविरामचिन्ह पाहिजे. आणि तें मध्येंच आलें असतां त्याच्या मागें व पुढें स्वल्पविरामचिन्ह पाहिजे.

उदाहरण. महाराज, मी आपल्याकडे आलों आहें.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मराठी अभ्यास परिषद

येथें, महाराज, हें संबोधन आरंभीं आहे, म्हणून ह्याच्या पुढें स्वल्पविराम चिन्ह पाहिजे.

दुसरें उदाहरण. तो म्हणाला, गड्यांनो, माझी गोष्ट ऐका.

येथें गड्यांनो, हे संबोधनच वाक्याच्यामध्यें आलें आहे, म्हणून त्याच्या मागें व पुढे स्वल्पविरामचिन्ह पाहिजे.

७. असतां, असतांना, इत्यादि शब्द वाक्यांत आले, तर त्यांच्यापुढें कधीं कधीं स्वल्पविरामचिन्ह पाहिजे.

उदाहरण. एक कोल्हा रानांत फिरत असतां, त्यास एक गाढव भेटला.

८. संबंधीं सर्वनाम व तें ज्याचा संबंध दाखवितें तें पुरुषवाचक, किंवा दर्शक सर्वनाम, हीं दोन सर्वनामें वाक्यामध्यें आली, व त्यांच्यामध्यें दुसरे शब्द आले आहेत, तर त्या पुरुषवाचक सर्वनामामागें, किंवा दर्शक सर्वनामामागें, स्वल्पविरामचिन्ह पाहिजे.

उदाहरण. जें पुस्तक तुम्ही मला वाचावयास दिलें होतें, तें मनोरंजक आहे.

९. परंतु जर संबंधीसर्वनाम व पुरुषवाचक सर्वनाम ह्यांच्यामध्यें दुसरे शब्द आले नाहींत, तर पुरुषवाचक सर्वनामामागें स्वल्पविरामचिन्ह नको.

उदाहरणे. जो तो माझी निंदा करतो. ज्याचे त्यास गोड वाटतें. ज्याचें त्याला द्यावें. मी काय इतका नीच आहें कीं ज्यांनीं त्यांनीं मला बोलावें ?

१०. आणि, तर, परंतु इत्यादि अव्ययें वाक्यांगांच्या मध्यें आली असतां, त्या प्रत्येक अव्ययाच्या मागें स्वल्पविरामचिन्ह पाहिजे.

उदाहरणें. तो उत्तम रीतीनें लिहितो, आणि चांगल्या डौलानें वाचतो. खरें पुसाल, तर तुमची चाल मला आवडत नाहीं. तो वाजविणारा चांगला आहे, परंतु त्यास गातां येत नाहीं.

११. कीं हे अव्यय वाक्यांत आले असतां, त्याच्या संबंधाप्रमाणें त्याच्या मागें किंवा पुढें, स्वल्पविरामचिन्ह पाहिजे.

उदाहरणे. तो म्हणाला कीं, मी येणार नाहीं. ह्यांत आश्चर्य नाहीं, कीं तो तुम्हांस सोडून गेला. त्यानें डागिने असे ठेविले, कीं समयास हातीं येतील. त्याला वाटलें कीं, मी मोठा शहाणा आहें. सर्वांस वाटतें कीं, आपण करितों तें चांगलें.

१२. कोणाचें म्हणणें किंवा लेख वाक्यांत घेतला असतां, त्या म्हणण्याच्या किंवा त्या लेखाच्या प्रारंभीं स्वल्पविरामचिन्ह पाहिजे.

उदाहरणे. शिवाजी म्हणाला, कीं, तूं आपल्या देशास जा. तुका जाणतो, सत्य बोले मुख, तेथें उचंबळे सुख.

१३. एका मनुष्याची किंवा वस्तूचीं दोन नामें आली असतां, व त्यांपैकीं कोणत्याही नामास दुसरे शब्द जुळले असतां, त्या प्रत्येक नामाच्या पुढें स्वल्पविरामचिन्ह पाहिजे.

उदाहरण. लक्ष्मीचा भाऊ, रामा, दुखण्यास पडला आहे.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मराठी अभ्यास परिषद

येथें, भाऊ आणि रामा हीं दोन नामें एकाच पुरुषाचीं आहेत; व भाऊ ह्या नामास लक्ष्मीचा हा शब्द जोडला आहे, म्हणून प्रत्येक नामाच्या पुढे स्वल्पविरामचिन्ह पाहिजे.

दुसरीं उदाहरणें. मराठ्यांचा राजा, शिवाजी, फार दिवस वारला आहे. सर्व लोकांच्या प्रीतींतला कवी, तुकाराम, वाणी होता.

१४. परंतु एकाही नामास दुसरा शब्द जोडला नाहीं, तर स्वल्पविरामचिन्ह नको.

उदाहरण. शिवाजी राजा वाड्यांत आहे.

येथें, शिवाजी व राजा ह्यांतून कोणत्याही नामास दुसरा शब्द जोडला नाहीं. म्हणून त्यांच्या पुढें स्वल्पविरामचिन्ह नको.

दुसरीं उदाहरणें. नामदेव शिंपी कवी होता. लाला लोहार मरायास टेंकला आहे.

अर्धविरामचिन्ह घालण्याचे नियम

१. ज्यांचा परस्पर जवळ संबंध नाहीं अशीं जीं निरनिराळीं वाक्यें, किंवा वाक्यांगें, एके लांब वाक्यांत येतात, त्या निरनिराळ्या वाक्यांच्या किंवा वाक्यांगांच्या मध्यें अर्ध-विरामचिन्ह पाहिजे.

उदाहरणें. काड्या पाण्यावर तरतात; परंतु मोत्यें पाण्याच्या तळीं असतात. त्याचे तेजावरून, हें रत्न आहे, असें तो समजला; परंतु त्याचें काय करावें, हें त्यास ठाऊक नव्हतें. त्या देशांत फार दिवसांपासून राजा नव्हता; सर्व सत्ता लोकांच्याच हातीं होती. फिरून मला पुसू नका; कांतर मी तुम्हांस जाऊं देणार नाहीं.

ह्या चार वाक्यांत जी निरनिराळी वाक्यें किंवा वाक्यांगें आहेत, त्यांचा परस्पर संबंध तुटक आहे, म्हणून त्यांच्या मध्यें अर्धविरामचिन्ह पाहिजे.

२. कधीं कधीं लहान लहान स्वतंत्र वाक्यांच्या मध्यें अर्धविरामचिन्ह घालतात; परंतु तसें करण्यास त्या वाक्याचा परस्परांशीं काही तरी संबंध पाहिजे.

उदाहरण. धनाचा अभिमान धिक्कारास कारण होय; विद्येचा अभिमान खेदास कारण होय; मोठेपणाचा अभिमान उपहासासी कारण होय; परंतु स्वमताचा अभिमान तर दुसऱ्यास सोसवतच नाहीं.

ही चार वाक्यें स्वतंत्र आहेत खरीं, परंतु ह्या सर्वांमध्यें एकाच विषयाचें, म्हणजे अभिमानाचें, वर्णन आहे, म्हणून ह्यांचा परस्पर संबंध आहे.

पूर्णविरामचिन्ह घालण्याचे नियम

१. स्वतंत्र व पूर्ण झालेलें असें जें वाक्य, त्याचे शेवटी हे चिन्ह पाहिजे.

उदाहरणें. अहमदनगर मुंबईच्या उत्तरेस आहे. परमेश्वर ह्या सृष्टीचा कर्ता आहे. मला वाटेंत तुमचा भाऊ भेटला.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मराठी अभ्यास परिषद

२. कधीं कधीं अशीं वाक्यें येतात कीं, त्यांच्या प्रारंभीं उभयान्वयी अव्यय असतें, तेणेंकरून त्यांचा पूर्णवाक्याशीं संबंध असतो, तरी पूर्ववाक्याच्या शेवटीं पूर्णविरामचिन्ह घाल्तात.

उदाहरणें. अशी त्यानें त्याची समजूत केली, ती फुकट गेली. कातर कामक्रोधादिकांच्या आवेशापुढें बुद्धीचें कांहीं चालत नाहीं. एकचित आहेत. तोपर्यंत त्यांवर शत्रूचें कांहीं चालत नाहीं; एकीचें इतकें माहात्म्य आहे. म्हणून तीं एकी चुगल्या ऐकून, किंवा शत्रूच्या गोष्टींस चित्त देऊन, तोडून न टाकितां दूरवर विचार करावा.

प्रश्नचिन्ह घालण्याचे नियम

१. वाक्यांत प्रश्न आला असतां, त्या वाक्याच्या शेवटी हे चिन्ह असावें.

उदाहरणे. ती कोठें आहे ? तुम्ही कोणीकडे जातां ? तिचे नांव काय ?

२. वक्ता जेव्हां दुसऱ्याचा प्रश्न सांगतो, पण प्रश्न करणाऱ्याच्या शब्दांचें अनुकरण करीत नाहीं, तेव्हां असल्या प्रश्नाचे शेवटीं हें चिन्ह नको.

उदाहरणें. मी कोठें राहातों, ह्याविषयीं तिचा प्रश्न होता. तुमचा मुलगा शाळेंत जातो कीं नाहीं, ह्याविषयीं तिचा प्रश्न होता.

उद्‌गारचिन्ह घालण्याचे नियम

१. ज्या वाक्यांत आश्चर्य, आनंद, खेद, इत्यादी मनोधर्मांचा उल्लेख असतो, त्या वाक्याचे शेवटीं, व हटकण्याचें शेवटी, हे चिन्ह घालावें.

उदाहरणें. काय मौज त्यानें केली ! काय चमत्कार हो ! माझी गोष्ट ऐका !

२. कधीं कधीं अशीं वाक्ये असतात, कीं शब्द मात्र पाहिले असता, प्रश्न संभवतो व उद्‌गारवाक्यही संभवतें. अशा वाक्यापुढें कोणतें चिन्ह घालावें ह्याचा निर्णय वक्त्याच्या अभिप्रायावरून करावा. प्रश्न करावयाचें जर त्याचे मनात होतें, तर प्रश्नचिन्ह घालावें; मनोधर्म दाखवावयाचें जर त्याचे मनात होतें, तर उद्‌गारचिन्ह घालावें.

उदाहरणे. आज मी किती श्रमलों ! हें ऐकून तुला केवढा आनंद झाला ! तो केवढा मूर्ख आहे ! परोपकार करण्याचे किती प्रसंग येऊन व्यर्थ गेले !

ह्या सर्व वाक्यांत प्रश्न करण्याची विवक्षा नाहीं; मनोधर्म मात्र दाखविला आहे; म्हणून उद्‌गारचिन्ह पाहिजे.

समाप्त

[पूर्वप्रसिद्धी : नारो रामचंद्र ठकार, पुणें पाठशाळा, पुणें १८५०
पुनर्मुद्रण : मराठी संशोधन-पत्रिका, मुंबई / वर्ष ४ थे, अंक ४ : जुलै १९५७]

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मराठी अभ्यास परिषद

विराम-चिन्हें

गोविंदाग्रज

[या अंकात डॉ. अशोक केळकरांच्या 'भाषा आणि जीवन' च्या ७ : ४ या अंकात प्रसिद्ध झालेल्या विरामचिन्हांविषयीच्या लेखावरील काही प्रतिक्रिया नोंदवल्या आहेत. त्या वाचत असतानाच गोविंदाग्रजांच्या या कवितेची आठवण झाली. मानवाच्या जीवनलेखातील काही विरामचिन्हे त्यांनी किती मार्मिकपणे नोंदवली आहेत!– **संपादक**]

जेव्हां जीवनलेखनास जगतां प्रारंभ मी मांडिला,
जो जो दृष्टिंत ये पदार्थ सहजीं वाटे हवासा मला !
बाल्याची पहिली अशी बदलती दृष्टी सदा बागडे,
तेव्हा 'स्वल्पविराम' मात्र दिसती स्वच्छंद चोंहींकडे !

आहे काय जगांत ? काय तिकडे ? हें कोण ? कोठें असे ?
सांगा ईश्वर कोण ? त्यापलिकडे तें काय ? केव्हां ? कसें ?
जें तें पाहुनि यापरी भकतसे, दृक् संशयें टाकित,
सारा जीवनलेख मी करितसे तैं 'प्रश्नचिन्हां'कित

अर्धांगी पुढती करी वश मना शृंगारदेवी नटे,
अर्धें जीवन सार्थ होइल इथें साक्षी मनाची पटे;
प्रेमानें मग एकजीव बनतां भूमीवरी स्वर्ग ये !
केला 'अर्धविराम' तेथ; गमलें येथून हालूं नये !

झाली व्यापक दृष्टि; चित्त फिरलें साश्चर्य विश्वांतरीं,
दिक्कालादि अनंतरूप बघतां मी होत वेड्यापरी !
सूक्ष्मस्थूलहि सारखीं भ्रमवती; लागे मुळीं अंत न,
त्याकाळीं मग जाहलें सहजची 'उद्‌गार'वाची मन !

आशा, प्रेम, नवीन वैभव, तशी कीर्तिप्रभा, सद्यश-
हीं एकेक समर्थ आज नसतीं चित्ता कराया वश !
सर्वांचा परमोच्च संगम चिरं जेथें असे जाहला,
देवा ! 'पूर्णविराम' त्या तत्र पदीं दे शीघ्र आतां मला !

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मराठी अभ्यास परिषद

‘ लागवड आणि परिभाषा ’

विजया देव

महाराष्ट्राच्या बाबतीत एकोणिसाव्या शतकाचा उत्तरार्ध व विसाव्या शतकाचा पूर्वार्ध हा कालखंड विविध क्षेत्रांतील कर्तबगारीने गजबजलेला आहे. आपल्या जीवनातील अनेक उणिवा लक्षात आल्यावर त्यांवर मात करण्याची जणू या काळात अहमहमिकाच लागलेली दिसते. त्याचाच एक भाग म्हणजे विविध विषयांवर झालेले लेखन. स्वभाषेचे प्रेम, तिला उर्जितावस्था आणण्याची धडपड व आपल्या कुवतीप्रमाणे काहीतरी करून दाखवण्याची उर्मी या प्रेरणा त्यामागे दिसतात. त्यातूनच लिहिले गेलेले हे एक पुस्तक : आम्रसंवर्धन अथवा आंब्यासंबंधी समग्र माहिती. लेखक : वामन रामचंद्र गाडगीळ, बी. एजी. हे प्रसिद्ध झाले १९१७ मध्ये.

फूटपाथवर जुनी पुस्तके चाळताचाळता सहज हातात आले व घेऊन टाकले. तेव्हा ते विकत घेण्याचा उद्देश वेगळा होता. लागवडीसंबंधीच्या माहितीसाठीच ते घेतले. वाचता-वाचता एका प्रकरणाशी थबकले. कारण तेथे लेखकाने वापरलेले पारिभाषिक शब्द. तो परिच्छेदच येथे जसाच्या तसा उद्धृत करते.

“... (२) कलमे करण्याची दुसरी एक रीत आहे. व तीत एखाद्या रायवळ किंवा जोरदार अशा झाडावर दुसऱ्या जातवान् झाडाचे तुकडे (कलमे) लावतात. ज्या रायवळ झाडावर कलम करावयाचे त्याला **‘ आधारतरू ’** * असे नाव देता येईल; यालाच इंग्रजीत ‘ stock ’ असे म्हणतात. व ज्या जातवान् झाडाचे कलम करावयाचे असेल, त्याला **‘ स्थाप्य* तरु ’** ‘ Scion ’ असे म्हणता येईल. ‘ आधारतरू ’ हा ‘ स्थाप्य तरूला ’ आधार देतो; पहिल्याला **‘ मूळझाड ’** * व दुसऱ्याला **‘ कलम झाड ’*** असे साधे मराठी शब्दही योजता येतील... ”

“ * [‘ नर ’ व ‘ मादी ’ ही नावेही (Scion व stock) कित्येकांनी दिलेली आहेत; परंतु लिंगभेदाचा या ठिकाणी काही एक संबंध नसल्यामुळे ही नावे योग्य नाहीत, असे आम्हांस वाटते. कित्येकांनी ‘ कलम ’ (scoin) व खोड (stock) असेही शब्द वापरले आहेत; परंतु ही नावेही इष्टार्थदर्शक नाहीत. **‘ पोषक तरू ’** (stock) व **‘ जातिवंत तरू ’** ही नावे ह्या नावापेक्षा अधिक चांगली आहेत. ही संस्कृत व मराठी नावे आम्ही मुद्दाम नवीन बनवून घेतली आहेत.][1]

विचारपूर्वक योजलेल्या या अर्थपूर्ण पारिभाषिक संज्ञांमागे विशिष्ट दृष्टीही आहे. कारण प्रस्तावनेत लेखक म्हणतो,

‘ ठिकठिकाणी भाषेतील पारिभाषिक शब्दांत भर पडावी, या हेतूने पूर्वी ज्या अर्थांचे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मराठी अभ्यास परिषद

शब्द मराठीत मुळीच नसतील, किंवा असले तरी लेखकाच्या समजुतीने समाधानकारक नसतील, त्या ठिकाणी, नवीन संस्कृत किंवा मराठी शब्द तयार करून ते आलटून पालटून वरचेवर वापरलेले आहेत. '

इतके सुंदर, अर्थवाही प्रतिशब्द १९१७ मध्येच उपलब्ध झालेले असताना, मराठी विश्वकोश खंड १८ परिभाषासंग्रह, १९७३ यामध्ये Scion व Stock साठी अनुक्रमे ' कलमफांदी ' व ' खोड ' असे प्रतिशब्द आहेत.

विजया देव, ६१/१४, एरंडवन, पुणे ४११ ००४.

१. जाड ठसा मूळ लेखकाचा.

भाची की मुलगी ?

एक मोलकरीण आपल्या मालकिणीला काही घरगुती अडचणी सांगत होती.

" बहिणीच्या मुलीचं लग्न ठरलंय बाई. भाचा सांगायला आला होता. दोन दिवस तरी रजा द्या... " वगैरे वगैरे.

तिच्या तोंडून बहिणीची मुलगी, बहिणीची मुलगी ऐकून बाई म्हणाल्या,

" म्हणजे भाचीच म्हण की, ग बहिणीची मुलगी काय ? "

मोलकरीण उत्तरली,

" भाची वेगळी, बहिणीच्या मुलीला आमच्यांत भाची नसतात म्हणत. भावाची मुलगी ती भाची. बहिणीची मुलगी म्हणजे आपलीच मुलगी असते. ती वेगळी नसते. "

विजया देव

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मराठी अभ्यास परिषद

अतिरंजित विधाने आणि जी. ए.

विद्या सप्रे-चौधरी

६८ सालच्या मार्चमध्ये जीए सरांच्या काही माजी विद्यार्थिनींचं स्नेहसंमेलन मी कॉलेजातील आमच्या मराठीच्या वर्गातच घडवून आणलं. इंटर आर्टसच्या विद्यार्थिनींना असलेल्या शंकांचं निवारण करण्यासाठी म्हणून सर वर्गात आले आणि अनपेक्षितपणे त्यांना अध्यक्षाची भूमिका वठवावी लागली.

सरांसमोर बोलताना शब्द किती तोलूनमापून वापरावे लागतात, याची मला कल्पना होती. तरीही " न भूतो न भविष्यति अशा एका लेखकाच्या आपण सगळ्या विद्यार्थिनी आहोत, ही केवढी भाग्याची गोष्ट ! " असं मी सहज बोलून गेले.

सरांनी मग ' न भूतो न भविष्यति ' हे माझं विधान खोडून काढण्यासाठी पस्तीस मिनिटांचं छानसं बौद्धिकच घेतलं.

सरांच्या त्या शब्दांचे मोती अजून माझ्या आठवणीत झगझगताहेत.

" प्रत्येक कालखंडात एखाद्या लेखकाचा खूप उदो, उदो होतो. काही मोजक्या कलाकृतींचा गाजावाजाही भरपूर होतो. तरीही व्यासांसारख्या प्रतिभावंताचा एकमेव अपवाद वगळता, अन्य कुणा लेखकाविषयी अशी भरमसाट विधानं सरधोपटपणे करू नयेत.

जगात ' एकमेव ' असं जे वाटतं, ते फक्त तत्कालीन संदर्भात खरं असतं. कशालाही ' अखेरचं ' असं म्हणणं सोपं आहे. पण भविष्याविषयी खात्री देणारे आपण कोण ?

एकानं स्थापनेला उच्चांक मोडण्यासाठी दुसऱ्याचा जन्म होत असतोच. एकूण आपल्या लोकांना भडक, अतिरेकी स्वरूपाची विशेषण जोडल्याखेरीज, Superlative degree वापरल्याखेरीज बोलताच येत नाही.

एखाद्या पुस्तकाचं वर्णन करताना ते चांगलं आणि वाईट यांच्या दरम्यान असलेल्या असंख्य शब्दांनी करता येईल. पण माझ्या एका मित्राला या कामासाठी Best किंवा Worst या दोन शब्दातला एकच पुरत असतो.

एकच कविता हाती असताना ती सर्वोत्कृष्ट किंवा एकमेवाद्वितीय असल्याचं कशावरून ठरवणार ?

युनिव्हर्सिटीत मी एकदा मॉडरेटरचं काम करत असताना माझा एक प्राध्यापक मित्र तिथं आला.

' मुलाचे मार्क्स काढण्यासाठी आलास का ? '

मी त्याची चेष्टाच केली होती. पण तो जोरात उत्तरला—

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मराठी अभ्यास परिषद

'माझा मुलगा युनिव्हर्सिटीला फर्स्ट येणार, याची खात्री आहे मला. 'रिझल्ट होण्याआधी त्याचे मार्क्स मी कशाला काढू ?'

मी चाटच पडलो.

स्वतःला प्राध्यापक म्हणवणाऱ्या या गृहस्थाला मुलाच्या बुद्धिमत्तेविषयी खात्री असेल. मुलाला अमुक टक्के मार्क्स पडतील, असंही हा पिता अचूकपणे सांगू शकतो ?

काहीही बोलताना माणसानं काटेकोरपणे शब्द वापरावेत. "धारवाडी काटा लोणी जोखण्यासाठीच नव्हे, शब्द तोलण्यासही वापरावा."

मुलांनी बेधडकपणे इंग्रजी भाषेवर अत्याचार केलेला पाहिला की, बेनन अँड स्मिथ स्कूलमधले आमचे सर म्हणायचे :

'इंग्रजी भाषेची ही मोडतोड पाहून शेक्सपियरचा आत्मा आपल्या कबरीत तडफडत असेल.'

'कुणी अतिरंजितपणे विधानं केली की, ती मला आवडत नाहीतच. पण माझ्याविषयी अशी भोंगळ वाक्यं कुणी वापरली की, माझा आत्मा जिवंतपणीच तळमळतो.'

[पूर्वप्रसिद्धी : महाराष्ट्र टाइम्स. १९९०.०६.२४ (मैफल).]

भाषावार्ता

मराठीचे यश

केंद्रीय लोकसेवा आयोगातर्फे गेल्या नोव्हेंबर, डिसेंबरमध्ये घेण्यात आलेल्या आय. ए. एस., आणि आय. पी. एस. च्या परीक्षेत राज्यातील पंचवीस विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून, त्यामध्ये पुण्यातील पाच जणांचा समावेश आहे. उत्तीर्ण झालेल्या साडेआठशे विद्यार्थ्यांत कोल्हापूरचा भूषण अशोक गगराणी तिसरा आला आहे.

सविता धर्माधिकारी, वामन पारखी, सदानंद दाते, विवेक फणसळकर, सुधीर बोबडे हे पुण्यातील विद्यार्थी या परीक्षेत उत्तीर्ण झाले आहेत. तिसऱ्या क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या गगराणी याने मराठी माध्यमातून परीक्षा दिली व मुख्य परीक्षेच्या दोन विषयांपैकी एक विषय मराठी होता.

गुणवत्ता यादीतील काही उमेदवारांची नावे अशी : अतुलचंद्र कुलकर्णी, सतीश पेंढारकर, नचिकेत जोशी, संदीप साळुंके, अशोक अवस्थी, संजय तरडे, यशवंत ठाकरे, अजित कोरडे, अजित गुप्ते, निखिल पंडित, अलोक खरे, संदीप प्रधान, धनंजय नाईक, सचिन भानुशाली, अजयकुमार दिघे, रामभाऊ पवार, अमरनाथ तळवडे, सुबोध देव, सुधीरकुमार राहते, चंद्रकांत कांबळे, शरदकुमार मेश्राम व भावना त्रिपाठी.

[दै. सकाळ, पुणे १९९०.०६.०५]

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मराठी अभ्यास परिषद

संगणक आणि मराठी भाषा : चर्चासत्र

विजया देव

आपल्या दृष्टीनं २३ आणि २४ जून १९९० हे दोन दिवस महत्त्वाचे, काहीशा धांदलीचे आणि समाधानाचे होते, कारण मराठी अभ्यास परिषदेच्या वतीने 'संगणक आणि मराठी भाषा' असं चर्चासत्र पुण्यात आयोजित करण्यात आलं होतं. 'इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनियर्स'मध्ये हे चर्चासत्र भरलं. जिज्ञासू आणि जाणते यांना एकत्र आणून संवाद साधणं, संगणकाभोवती असलेलं एकप्रकारचं जादूचं वलय भेदून तो आपलासा वाटायला लावणं आणि त्याच्या वापराबद्दल आत्मविश्वास देणं हे या चर्चासत्राचं उद्दिष्ट होतं. आणि ते पुष्कळसं गाठता आलं असं म्हणता येईल. नुसत्या तत्त्वचर्चेला प्रात्यक्षिका-चीही जोड द्यावी या उद्देशाने या चर्चासत्राला जोडूनच एक प्रदर्शनही भरवण्यात आलं होतं. संगणकक्षेत्रातील विविध व्यावसायिकांनी यात भाग घेतला व आपली उत्पादने तेथे मांडली. त्यामुळे आतापर्यंत या क्षेत्रात काय काय साध्य झाले आहे, होऊ शकते याची कल्पना येथे येणाऱ्यांना आली.

इथे परिषद-परिवारातील जे लोक आले नाहीत, येऊ शकले नाहीत त्यांच्यासाठी हा वृत्तांत.

चर्चासत्राच्या पहिल्या दिवशी संगणकाशी तोंडओळख आणि विविध क्षेत्रात संगणकाचा वापर या विषयांवर वेगवेगळे तज्ज्ञ बोलले. यातून संगणकाचे हार्डवेअर (तंत्रावली), सॉफ्टवेअर (मंत्रावली), कृत्रिम प्रज्ञा इत्यादींबद्दल माहिती देण्यात आली. व्यवस्थापन, आयुर्वेद, शिक्षण, उद्योगजगत अशा विविध क्षेत्रात संगणक कसा प्रभावीपणे वापरता येतो हे त्या त्या क्षेत्रातील व्यक्तींनी सांगितले.

संगणक तंत्रज्ञान पाश्चात्त्य देशातून आले असले तरी त्यासाठी इंग्रजी भाषेवरच विसंबून राहायला हवे असे नाही. भारतीय भाषा व लिप्या यांच्यातूनही संगणक वापरता येतो, तसे प्रोग्रॅम (सूचनावली) बनवता येतात, तंत्रावली व मंत्रावली यांची रचना आपल्या लिप्यांना अनुकूल बनवता येते असा विश्वास दुसऱ्या दिवशीच्या चर्चेतून निर्माण झाला. इंग्रजी भाषेचं दडपण झुगारून आमच्या भाषेत आम्ही सर्व कार्ये पार पाडू शकतो, एवढेच नव्हे तर प्रगत अध्ययनही करू शकतो ही जाणीव श्रोत्यांना झाली.

शनिवारी सकाळी प्रदर्शनाचं उद्घाटन 'सकाळ पेपर्स'चे कार्यकारी संचालक श्री. प्रताप पवार यांच्या हस्ते होऊन या सर्व कार्यक्रमाला सुरुवात झाली. व चहापानानंतर चर्चासत्राला सुरुवात झाली. त्याचे उद्घाटक 'सी डॅक'चे संचालक डॉ. विजय भटकर हे

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मराठी अभ्यास परिषद

होते. या उपक्रमाच्या निमित्ताने परिषदेने एक पुस्तिका काढली आहे. तिचे प्रकाशनही डॉ. भटकर यांच्या हस्ते झाले. या पुस्तिकेत संगणकाविषयी तज्ज्ञांचे लेख तसेच पुण्यातील सर्व संगणक शिक्षण संस्थांची माहिती आहे. पुस्तिकेची किंमत पाच रुपये असून वाचकांना ही हवी असल्यास उपलब्ध आहे. (त्याविषयी याच अंकात इतरत्र चौकटीत माहिती आहे.)

या चर्चासत्राला उपस्थित असलेली मंडळी सुशिक्षित, वेगवेगळ्या व्यवसायातील पण संगणकाच्या कार्यपद्धतीबद्दल विशेष माहिती नसलेली अशी होती. त्यामुळे पहिल्या दिवसातील चर्चाविषयांचा रोख संगणकाची रचना, त्याची द्विमानी (binary) भाषा, कृत्रिम प्रज्ञा या विषयांवर होता. संगणकाचा संचार सर्व क्षेत्रात व्हायला लागल्यापासून राजकारणापासून पत्रिका जुळवण्यापर्यंत सर्व ठिकाणी त्याचे अस्तित्व जाणवते. पण इतक्या विविध क्षेत्रात त्याचा वापर होतो तरी कसा अशी शंका स्वाभाविकपणेच आपल्या मनात येते. त्याला उत्तर ' विविध क्षेत्रात संगणकाचा वापर ' या सत्रातून मिळाले. व्यवस्थापन, अभियांत्रिकी, आयुर्वेद, शिक्षण अशा विविध क्षेत्रातील अनुभवी मंडळींनी संगणकाची उपयुक्तता तसेच मर्यादाही मांडली. पहिल्या दिवसाचा शेवट डॉ. अजित केंभावी यांच्या (संगणक आणि खगोलविज्ञान ', या विषयावरील व्याख्यानाने झाला. खगोलविज्ञान आणि भौतिकी यांना जोडणारा खगोलभौतिकी किंवा ॲस्ट्रो फिजिक्स हा विषय आहे. त्यातील अत्यंत प्रगत संशोधनासाठी संगणकाचा वापर कसा होतो हे डॉ. केंभावींनी शक्य तितक्या सोप्या पद्धतीने सांगितले. टेलिस्कोपबद्दलची माहिती व प्रकार, आकाशगंगांची संगणकावर निर्मिती का व कशासाठी याबद्दल त्यांनी विवेचन केले.

या दिवसभरातून असे स्पष्ट झाले, की संगणकाचे काही चटकन कळणारे व्यावहारिक उपयोग असतात. आणि काही त्या पलीकडचे उपयोग असतात. त्यांच्यासाठी असामान्य प्रतिभा आणि चिकाटी लागते. कारण विकसित जग जेथे आहे ते नुसते समजून घ्यायचे म्हटले तरी अविश्रांत धडपड करावी लागते.

पहिल्या दिवसाचा समारोप डॉ. अशोक रा. केळकर यांनी केला.

संगणकावर देवनागरी लिपीचा वापर करण्याबद्दल विविध दिशांतून झालेले प्रयत्न व त्यांचे फलित यांच्यावर दुसऱ्या दिवशी चर्चा झाली. साहजिकच या चर्चासत्रात संगणक वैज्ञानिक, संगणक अभियंत्रे, मुद्राक्षर विद्यातज्ज्ञ प्रकाशक, मेजावरील मुद्रकाचा लाभ घेणारे अशा वेगवेगळया व्यक्तींचा समावेश होता.

चिनी भाषेत बावीसशे लिपीचिन्हं असूनदेखील ती संगणकावर बसवता येतात तर देवनागरीची सोय संगणकावर करणे जिकरीचे नाही असाच तज्ज्ञांचा अभिप्राय होता. ग्राफिक बेस कळफलकाऐवजी फोनेटिकबेस कळफलक भारतीय भाषांसाठी तंत्रावलीच्या मार्गाने करण्याविषयी श्री. पृथ्वीराज चव्हाण बोलले. तर नॅशनल सेंटर फॉर सॉफ्टवेअर टेक्नॉलजी 'च्या वैज्ञानिक श्रीमती लक्ष्मी यांनी ' विन्यास ' या सॉफ्टवेअर पॅकेजची व ' विशाखा ' या देवनागरी मुद्राक्षरांची माहिती दिली.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मराठी अभ्यास परिषद

फोटोटाइपसेटिंग, डेस्कटॉप पब्लिशिंग, छपाई यांच्याशी व्यवसायाच्या निमित्ताने निगडीत असलेले श्री. राजीव भागवत, आनंद लाटकर, कु. श्री. अर्जुनवाडकर, सुजित पटवर्धन यांनी त्या त्या क्षेत्रातील कामगिरीचे यशापयश सांगितले.

भोजनोत्तर सत्रात वाङ्मय, समाजशास्त्र, शिक्षण या क्षेत्रात संगणकाचा वापर हा विषय होता. 'सीडॅक 'मधील ज्ञानाधिष्ठित संगणकतज्ज्ञ डॉ. सं. ना. भावसार म्हणाले की, स्मृति-बद्ध तंत्राच्या आधारे येथे काम सुरू झालेलं आहे. पण संगणकीय कामात आपल्याच ज्ञान-अज्ञानाचं प्रतिबिंब दिसतं.

'शिक्षणामध्ये संगणकाचा वापर' याविषयावर बोलताना श्री. पु. ग. वैद्य यांनी काही विचार अत्यंत ठामपणे व खणखणीतपणे मांडले. आपल्या शाळांमधून संगणक मुलांपर्यंत येतोच आटवीनंतर, ही दुर्दैवाची गोष्ट आहे. तो फार लौकर यायला हवा तरच नवखेपणा संपून त्याच्याशी खरी दोस्ती होईल असं मत त्यांनी मांडलं. तसंच वाचनाची गती किती आहे ते काढणं, ती वाढवणं, चुकादुरुस्ती, आकडेमोड कौशल्याच्या कसोट्या, अवधान-काल (Span of attention) वाढवणं अशा अनेक क्षेत्रात मुलांच्या प्रगतीसाठी संगणकाचा वापर करून घेता येईल असं त्यांनी सुचवलं.

संगणकामुळे निर्माण झालेल्या काही सामाजिक बाजूंची दखल डॉ. शरच्चंद्र गोखले आणि राजीव साने यांनी घेतली. डॉ. गोखले म्हणाले, की कार्यक्षमता, अचूकपणा, वेग माहिती साठवणे व हवी तेव्हा देणे ही संगणकाची वैशिष्ट्ये असली तरी शैली, रसवत्ता, सांस्कृतिक पार्श्वभूमी या गोष्टी संगणकाच्या आवाक्याबाहेरच्या असतात. त्यापुढे संगणक हा पूरक म्हणून वापरावा, पर्याय म्हणून नव्हे हे भान माणसाने सतत ठेवले पाहिजे. संगणक आणि आपलं जीवन यांना जोडायला डॉ. गोखल्यांच्या विचारांची मदत झाली.

तंत्रज्ञशाहीतून सामाजिक-आर्थिक प्रश्न निर्माण होत असतात. त्यांची दखल श्री. साने यांनी घेतली. संगणकयुगाची वेगळी संस्कृती निर्माण झाल्याने एक प्रकारची तांत्रिक धुंदी समाजाला चढायला लागली आहे. एखादी गोष्ट अधिकाधिक वाकबगिरीनं करणं चांगलंच पण ती आपण कशासाठी करत आहोत याचा विसर पडला तर संभ्रमित अर्जुन निर्माण होतो व ऐन युद्धप्रसंगी त्याला गीता सांगावी लागते अशा मार्मिक शब्दात सान्यांनी 'संगणक ही मस्तिष्काला दिलेली जोड आहे, हृदयाला दिलेली जोड नव्हे' हा मुद्दा मांडला.

आभारप्रदर्शन व समारोप यानंतर दोन दिवसांच्या या चर्चासत्राची समाप्ती झाली. 'या चर्चासत्राची फलश्रुती काय?' या प्रश्नाचा वेध डॉ. अशोक रा. केळकर यांनी अत्यंत वस्तुनिष्ठ पद्धतीने घेतला.

या दोन दिवसात व त्यानंतरही ज्या प्रतिक्रिया ऐकू आल्या त्यावरून, परिषदेने अनेकांना आपलेसे केले आहे हे जाणवले व उमेद आली.

विजया देव, ६१/१४ एरंडवन, आयकर भवनाजवळ, पुणे ४११००४.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मराठी अभ्यास परिषद

पैसे भरण्याबद्दल सूचना

पैसे रोख दिल्यास आठवणीने पावती घ्यावी. चेक ' मराठी अभ्यास परिषद ' या नावाने काढावा. मनीऑर्डर कूपनवर किंवा चेकसोबतच्या चिठ्ठीवर पैसे पाठवणाराचे नाव, पत्ता, रक्कम, आणि ती कशापोटी पाठवली ते अवश्य लिहावे. नमुना अंक मिळाला असल्यास कोणता मिळाला याचा उल्लेख करावा. चेक बँकेच्या पुण्याबाहेरच्या शाखेचा असल्यास रकमेत २ रुपये वटणावळ म्हणून भर घालावी. पावती मागाहून पाठविली जाईल.

पत्रिकेची वर्गणी

पत्रिकेची वार्षिक वर्गणी भरताना पत्रिकेचे वर्ष जानेवारी ते डिसेंबर असेच राहील हे लक्षात घ्यावे. पत्रिकेचे वर्षात चार अंक निघतात. मात्र १९८३ मध्ये केवळ दोनच अंक निघाले आहेत. पत्रिकेचे चालू वर्षाव्यतिरिक्तचे अंक हवे असल्यास मिळू शकतील. सध्या-तरी त्यांची आकारणी वर्गणीच्याच दरात करण्यात येते. ती पुढीलप्रमाणे :

चालू वर्गणी परिषदेच्या सामान्य सभासदांसाठी (सभासद वर्गणी धरून) वर्षाला ३० रु.

चालू वर्गणी संस्था आणि सभासद नसलेल्या व्यक्ती यांसाठी वर्षाला ४० रु.

सुट्या अंकाला (मग तो चालू वर्षाचा असो की मागील वर्षांपैकी असो) १० रु.

मागील अंक मागवताना वर्ष १ (१९८३) मध्ये फक्त दोन अंक निघाले, वर्ष २ (१९८४) पासून मात्र दर वर्षाला चार अंक निघाले हे लक्षात घ्यावे.

परिषदेची वर्गणी

सामान्य सभासदाची वार्षिक वर्गणी वर दिलीच आहे. एका घरात एकापेक्षा अधिक सामान्य सभासद असले आणि त्यांपैकी एकाच्याच नावावर पत्रिकेचा अंक हवा असला तर इतर सभासदांनी केवळ १५ रु. भरायचे आहेत. उदाहरणार्थ, एका घरात दोन सभासद आणि एक अंक अशी स्थिती असल्यास वर्षाला ३० रु. + १५ रु. भरावे लागतील.

आजीव सभासदत्वासाठी २०० रु. (परदेशी अंक पाठवायचा असल्यास शिवाय १०० रु.); देणगीदारासाठी ५०० रु. किंवा जास्त; आश्रयदात्यासाठी १००० रु. किंवा जास्त. (आजीव, देणगीदार, आश्रयदाता सभासदांना पत्रिकेची वेगळी वर्गणी नाही.)

परिषदेचे सभासदत्व व्यक्तीला मिळेल, संस्थेला नाही.

जाहिरातीसाठी दर

पूर्ण पान ७५० रु., अर्धे पान ४०० रु., पाव पान २५० रु., शुभेच्छासूचना १०० रु., आवरणपृष्ठ चार १००० रु., आवरणपृष्ठ दोन / तीन ८०० रु. जाहिरात हिंदीत वा इंग्रजीत असल्यास चालेल, मराठीत असल्यास उत्तम.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मराठी अभ्यास परिषद

नोंदणी क्रमांक 040048/83

मराठी अभ्यास परिषदेच्या वतीने

संगणक आणि मराठी भाषा

प्रदर्शने आणि चर्चासत्र

पुणे येथे जून मध्ये झाले त्यानिमित्त प्रकाशित झालेली

पुस्तिका

आता उपलब्ध आहे.

मॅक्सीन बर्न्सन, अशोक रा. केळकर, निनाद माटे,
कूपर– जोशी– चितळे, अर्जुनवाडकर, गायकैवारी
यांचे माहितीपूर्ण व विचारप्रवर्तक लेख

वि. द. आपटे यांची संगणक परिभाषा (इंग्रजी–मराठी)
पुण्यातील संगणक शिक्षणाच्या सोयींची एक उपयुक्त सूची

किंमत ५ रुपये

संपर्क

मराठी अभ्यास परिषद, द्वारा अक्षरछाया,
२०३५ सदाशिव पेठ, टिळक रोड, पुणे ४११ ०३०

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

मराठी अभ्यास परिषद